रविकिरण मंडळाचें बेचाळिसावें पुस्तक

# वा क ळ


३०१९८९६
म. ग्रं. मं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ७३३७


कवि

य श व न्त

REFBK-0009114
REFBK-0009114

एकमेव विक्रेते : चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

किंमत तीन रुपये



वादळ
—यशवंत—

वाचनालय ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

अनुक्रम .......... वि. ..........

क्रमांक .......... नों: दि: ..........

रविकिरण मंडळाचें बेचाळिसावें पुस्तक

# वाकळ

कवि
यशवन्त

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ८११
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्र
अनुक्रम ........... वि. ...........
क्रमांक ... ............... ... नों: दि: ...........
REFBK-0009114

एकमेव विक्रेते : चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

किंमत तीन रुपये

प्रकाशक :

**यशवंत दिनकर पेंढरकर**

१९६/३४ सदाशिव पेठ, पुणें २.

सर्व हक्क कवीकडे

प्रथमावृत्ति — मार्च, १९५६

वेष्टण — चित्रकार गोलिवडेकर

सुद्रक :

**दामोदर त्र्यंबक जोशी,**

चित्रशाळा प्रेस, पुणें २.

**श्री. सौ. पद्मिनीराजे पटवर्धन**

एम्. ए., एल्एल्. बी.

**यांच्या कलाप्रियतेस**

[illegible] स्वतन्त्र[illegible]
[illegible] वि. [illegible]
[illegible] नों: दि: [illegible]

# वाकळ

भरजरी रेशमी उंची शालू शेले
असतील कुणी तुज अहेर असले केले
दारिद्र्य माझिया घरांत विस्वे अठरा
हा पिटाती नगारा ढोल सदा परभारा
आधीच सत्य तुज कळून आल्यावरती
का बुजं कराया वाकळ ही तुजपुढती ?

वनविली वस्तु जी जोडुन चिंध्या ठिगळें
सौन्दर्य आणि तें मोल तरी तिज कसलें
चोंदवा रेशमी, कुठे भरजरी काठ,
हा काशिद्यामधला इथे नदीचा काठ
दाविली तियेच्या होती पाणीं नाव
लहरींत बिलगल्या होतें विणलें नांव
ते विटले रंग नि झडले सगळे धागे
कांहीच निशाणी आणिक . नरली मागे

हें ठिगळ :- केशरी रंग ह्यावरी अजुन
तें हिऱ्यांत होतें दुजें निघालें भिजुन
आसवें कुणी तीं कृतज्ञतेचीं टिपलीं
आसवें कुठे सौख्यातिशयें ओघळलीं
शोषिले कुणी हुंदके आणि निःश्वास
झिरपले असेलहि कुठे हृदय भग्नाश
कितिकांतुनि असले फुलोऱ्यांचे गन्ध
गुदमरत इथे असतील अजूनहि मन्द

मळले प्रसंगा-प्रसंगांतुनी नटलीं
तीं वस्त्रें झालीं जीर्ण आणि जरि विटलीं
वासनांत त्यांना तथापि होतें जपलें
अवशेष तयांचे येथे भावें टिपले
विटल्या नि फाटल्या वसनांचा हा कचरा
ह्या ठिगळांतचि परि माझीं विश्वें अठरा.

पुणें
१-२-५६.

यशवन्त

# चार शब्द

" ओजस्विनि " हा कवितासंग्रह १९४६ च्या जानेवारींत प्रसिद्ध झाला. त्यानंतरच्या कवितांचा संग्रह प्रकाशित करण्याचा मी अनेकदा बेत केला. चहात्यांनीही अधूनमधून आस्थेने विचारपूस करून प्रेरणा दिली. पण मुद्रणालयाकडे जाण्याकरितां उचललेलें पाऊल वेळोवेळीं मागे घेतलें. आता सुद्धा हा हिय्या केला त्याला कारण श्री. दामूअण्णा रानडे आणि श्री. अनंतराव कुलकर्णी यांचें प्रोत्साहनच ! हिय्या होत नव्हता ह्याला कारण गेल्या दहा वर्षांतील जबरदस्त स्थित्यन्तरें. उभारी आटून जावी असे गरम गरम वारे वाहूं लागले आणि उत्साहावर विरजण पडावें अशा घटना घडत आल्या. हा संग्रह छापायला प्रवृत्त झालों, म्हणून आतां कांहीं अनुकूल बदल घडण्याचीं सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत, असें नव्हे. पण—तूर्त, सुहृदांचें प्रोत्साहन प्रभावी ठरत आहे, एव्हढे खास !

' वाकळ ' हें ह्या कवितासंग्रहाचें नांव पाहतांच, ' ही तुझीच वाकळ म्हणुनि मला लै प्यारी ' ह्या माझ्या कवितेची पुष्कळांना आठवण होईल. पण त्या वाकळीशी हिचा तादृश संबंध नाही. ती वाकळ ग्रामीण जीवनांतील, विधवेच्या प्रपंचांतील ! ही "वाकळ" माझ्या काव्य-प्रपंचांतील आहे, माझ्या काव्य-प्रपंचाची निदर्शक आहे. जें काहीं सांगण्यासारखें आहे तें ह्या कवितेंत येऊन गेलेंच आहे.

गेल्या दहा वर्षांतील सर्वच कवितांचें संकलन इथे करणें आवाक्याबाहेरचें होतें. ' संगीतिका ' सुद्धा ( अनुकूल काळ येतांच प्रकाशित करतां येतील ह्या आशेने ) बाजूला ठेवून दिल्या आहेत. इथे समाविष्ट केलेल्या कवितांपैकीं आद्यन्तींच्या कवितांची योजना

सहेतुक आहे; बाकीच्या होतां होईल तों कालानुक्रमे छापल्या आहेत. ' होतां होईल तों ' असें म्हणण्याचें कारण हें की कांही कवितांच्या बाबतींत तीहि व्यवस्था होऊं शकली नाही. वेळेवर पंगत न साधणारांची कशी तरी सोय लावावी लागते ! तशी त्यांची स्थिति झाली आहे. पण ' वाकळ ' म्हटल्यावर ही सारी अव्यवस्था स्वाभाविकच ठरेल.

महाराष्ट्र साहित्य परिषदेने पुरस्कारलेल्या शुद्धलेखनाच्या अंगिकार करण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि, बाळपणापासून हाडींमासीं मुरलेलें वळण, अनवधान होतांच, डोकवलें असल्याची शक्यता आहे. तरी असल्या उण्या—अधिकाकडे सावरून घेण्याच्या नजरेने पाहावें, अशी विनंति आहे. बाकी, कवितांकडे कसें पाहावें, हें काय सांगायचें ? तो ज्याचा त्याचा अधिकार आहे.

पुणें २.
१–३–१९५६

यशवंत दिनकर पेंढरकर.

* * *

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. दीप | - | ९ |
| २. भ्रमसि विमाना नभांतुनी | - | १२ |
| ३. मिटल्या नयनीं भुवनें सुंदर | - | १५ |
| ४. व्यासपीठावरील त्रिमणी | - | १८ |
| ५. पांथाचें मागणें | - | १९ |
| ६. त्या स्थळीं | - | २१ |
| ७. रुप्याची धारा | - | २३ |
| ८. बालका असाच झोप | - | २५ |
| ९. हा बालक बसला कागद टरकावीत | | २६ |
| १०. ही पुन्हा न येईल वेळ | - | २८ |
| ११. लोकमातांनो | - | ३१ |
| १२. रूळ आणि माळ | - | ३४ |
| १३. सुखरूप | - | ३५ |
| १४. ती चिरंजीवता खरी | - | ३६ |
| १५. झोपलेला बालक पाहून | - | ३८ |
| १६. पत्राची पेटी | - | ३९ |
| १७. सुहाग | - | ४० |
| १८. कवि आणि कविता | - | ४१ |
| १९. अहल्येचा धावा | - | ४६ |
| २०. हें मिळेल का कधि | - | ४९ |
| २१. श्रेष्ठांच्या ह्या संगतींत | - | ५१ |
| २२. उभा वारंवार दारीं | - | ५४ |
| २३. मार्गावरल्या ऊन-सावल्या | - | ५५ |
| २४. श्रेयाचे वाटेकरी | - | ५६ |

अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| २५. जाई निघून भ्रमर | - | ५९ |
| २६. देवाच्या दागिन्यांची चोरी | - | ६२ |
| २७. उजाडणार केधवा | - | ६४ |
| २८. माझे विधाते | - | ६६ |
| २९. कालवा आणि नदी | - | ६८ |
| ३०. व्याकुळ होतों मनीं | - | ७१ |
| ३१. ऋजुता | - | ७२ |
| ३२. उभी एक मी टेकडी | - | ७४ |
| ३३. झालों भाग्यविधाते | - | ७५ |
| ३४. हा कोरा कागद | - | ७७ |
| ३५. छोकरा असे बिलंदर | - | ७९ |
| ३६. शृंगारिले प्राणी | - | ८१ |
| ३७. कोसळती हे अनेक पाझर | - | ८३ |
| ३८. नातवाच्या बारश्याला | - | ८५ |
| ३९. सुस्वागत | - | ८७ |
| ४०. करील घरणी सहन कोठवर | - | ९० |
| ४१. प्रेक्षक | - | ९२ |
| ४२. तरी तो निर्धन धनाढ्यहि | - | ९५ |
| ४३. शिवारांतल्या मुशाफिरास | - | ९७ |
| ४४. कागदी फुलांनो | - | ९९ |
| ४५. तीं हींच फुलें का | - | १०१ |
| ४६. हे हार गौरवाचे | - | १०४ |
| ४७. नको थांबवूं कारंजें | - | १०६ |
| ४८. दिवसामागून चालले दिवस | - | १०७ |
| ४९. कां करितों कविता | - | ११० |
| ५०. हा टपालवाला | - | १११ |

अनुक्रमणिका


५१. मराठीच्या देहलीवरून - ११३
५२. अर्ध्यामुर्ध्या कवितांनो ! - ११६
५३. मुलामा नवा - ११८
५४. निद्रेस - १२०
५५. देहाचा निरोप घेतांना - १२१
५६. मना - १२३
५७. केलीत घराची होळी - १२५
५८. बरणींतील फुलें - १२९
५९. वजाबाकी - १३१
६०. मुगारे - १३२
६१. नमत्याच्या छायांनी - १३३
६२. हद्द - १३५
६३. माझे मोरेकरी - १३७
६४. या रे फुलपांखरांनो - १४१
६५. राणीच निरंतर तूं - १४३
६६. भेट व्हावी वारंवार - १४६
६७. तूं येतेस समोरुनी - १४८
६८. रंकाच्या ऋजु भावना - १४९
६९. जा हीं देउनि साक्ष - १५०
७०. मज नव्हती हिंमत - १५१
७१. रेल्वेच्या रुळांची मनोव्यथा - १५३
७२. पुकार - १५५
७३. जळत्या मेणबत्त्या - १५८
टीपा १६०-१६४


* * *

म. ग्रं. ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७११
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# वा क ळ

## १. दीप

[ गज्जल वृत्त—मेनका

दीप हा सांभाळुनी मीं आणिला
तेवतां तज्ज्योति राहो उज्ज्वला

घोर घोंगावून आलीं वादळें
लोटलीं तैशींच विघ्नांचीं दळें
कैकदा जी जाहली कम्पाकुला
तेवतां ही ज्योति राहो उज्ज्वला

कौरवांनी ओढिली जेव्हा निरी
पैठण्या-पीतांबरांना श्रीहरी
लाज राखाया जियेची धावला
तेवतां ही ज्योति राहो उज्ज्वला

झोपडीमाजी बघोनी एकटी
नेइ कापट्यें हिला लंकापती
ध्वंसुनी लंकेसवे त्याच्या कुला
तेवली ही शुद्धशीला उज्ज्वला

✤ ✤ ✤

घोर झंझावात आला यावनी
पार वाताहात झाली दख्खनीं
जागवी जी तेधवा सह्याचला
स्फूर्ति-शौर्याने भरोनी मावळा

तेज येऊं लागलें जों गोमटें
लोटलीं चौ बाजुंनी तों संकटें
जाइ तैं वेषान्तराने जिंजिला
तेवती ती ज्योत राहो उज्ज्वला

✤ ✤ ✤

भारती शूरांचिया खड्गांतुनी
भारती संतांचिया वाणींतुनी
भारती नेत्यांचिया त्यागांतुनी
भारताच्या तेवली उद्धारणीं

पेट घेई जी कुरुक्षेत्रामधे
पेट घेई जी पुन्हा झांशीमधे
आणि मंडाल्यास जी फाके पुन्हा
देइ चैतन्यें नवीं भीरू जनां

येइ का कारागृहीं ती कोंडितां ?
येइ का सत्तामदें ती दापितां ?
अर्गला वा संगिनी वा शृंखला
रोधिती का तेवत्या ह्या ज्योतिला ?

✤ ✤ ✤

कद्रुच्या दास्यांत माता पिंजतां
जाहला देवांसवे जो झुंजतां
आणि आणी जिंकुनी जो अमृता
घेउनी त्या वैनतेयाच्या व्रता—

आजवेरी मांडला घोरांदर
दुर्मदांधांसंगतीं जो संगर
संपला भासे जरी तो आजला
तेवती ही ज्योति राहो उज्ज्वला

क्षाळुनी साऱ्या खलां, ही चित्कला
भूतला होवो भविष्यीं मंगला

५-११-४७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम २०२८७ वि. ८१०४
* क्रमांक ...*...९३३९... नों: दि: २४/८

म्हणुनि धरा ही त्यजुनि उणी
भ्रमसि विमाना नभांतुनी ?
जाशिल तिकडे मार्ग खुला
रोधिल तेथे कोण तुला ?
चाकोरींची गरज नसे
अनुसरणाची सक्ति नसे
भ्रमणालागी हद्द नसे
निज तंत्राविण बंध नसे
खग वैतालिक
शनि अंगारक
गातिल कौतुक
परि सरल्यावर हाय, गति
गति तुजला न धरेपरती !

पुणें ४-१२-४५

* * *

# ३. मिटल्या नयनीं भुवनें सुन्दर

[ जाति–पादाकुलक

पडलों असतां मिटून डोळे
अमर्याद किति विश्व निराळें
मिटल्या नयनीं होतें विकसत
सौन्दर्यानें मुसमुसलेलें.

दुनिया रंगी-बेरंगी ती
गोचर होई असुनि निराकृति
आला होता ऐन भरातें
खेळ पाठशिवणीचा तेथें.

चौकोनावर त्रिकोण वर्तुळ
हिरवे पिवळे सुनील श्यामल
त्यांत लवलवे वीज-शलाका
सरकुनि जाई मेघ-मालिका;
एकसारखीं भुवनें ऐशीं
प्रगटुनि होतीं जात लयासी.

बहिर्गोल ह्या भूपृष्ठावर
धावत सुटतां वाहन-माला
एक एक तीमधील पुढचें

जेंवि दृष्टिच्या पल्याड जाई,
मिटल्या नयनीं असेंच कांहीं
एकसारखें लोपत राही.

विविध छटांच्या झोत द्युतिचे
सरसावति ते अष्ट दिशांतुन,—
जणु टिपऱ्यांचा खेळ खेळती,
कीं तेजाचे गोफ गुंफिती,
झाल्या कीं परिरंभण-निरता
प्रेमनिर्भरा उत्कट सरिता.
अद्भुत रंगुन धमाल ऐशी
बघतां बघतां जाइ लयासी.

मिटल्या नयनां पुन्हा चोळुनी
बघूं लागतां मिटल्या नयनीं
दृश्य उमलतें दिव्य निराळें
जया न बघती उघडे डोळे.

थेंब ठिबकती एकीकडुनी
तमःशिलेवर फुटतां पडुनी
थेंबाथेंबागणिक उसळुनी
लोळ दीप्तिचे चढती गगनीं
लोकाग्रणिचे बोल ज्यापरी
स्फोट पावती जनहृत्कुहरीं.

मिटल्या नयनां चोळुनि बघतां
दृश्यामाजी प्रगटे नवता.
नेत्र-दलें तर सान शिम्पले
परंतु त्यामधि अथांग डहुळे

दों बाजूंला वा खालींवर
सताळ नीरव कसला सागर,
तुफान लाटा – पंखचि कीं ते
विश्वव्यापी क्रान्ति पसरिते.

मिटल्या नयनां बघतां चोळुन
पुन्हा येइ नव दृश्य उफाळुन;
चूर्ण गुलालसम सोन्याचें
मुठींमुठींने कोणी उधळी,
जगदुद्धारक की पुरुषोत्तम
होइ फिरुन अवतीर्ण भूतळीं,
म्हणून जन्मोत्सवीं तयाच्या
दंगल होती अशी चालली.

शत पैलूंच्या भिंगामधुनी
एकचि वस्तू हो शतगुणिता,
परि प्रकाशाशिवाय कुठुनी
नेत्रा भिंगा ती दृक्क्षमता ?
मिटल्या नयनीं मात्र भराभर
अनन्त फुलतीं भुवनें सुन्दर.

पुणें, ५-१२-४५

★ ★ ★

# ४. व्यासपीठावरील चिमणी

[ वृत्त–शा. विक्रीडित

येथे उत्सव चालला, बहरली साहित्यिकांची सभा
कोणाही भलत्या जना अरसिका नाही प्रवेशा मुभा
तूं निःशंकपणें घुसून चढसी ह्या व्यासपीठावरी
जात्या भीरु असून तूं धिटुकली झालीस कैशी तरी ?

हे प्रस्ताव, विचार मौलिक, मत–प्रस्थापनें उत्कट
सारें ऐकुन हो तुझा समज कीं आहेत हे पोपट ?
" जेथे पोपट आपुले प्रगटती सावेश वाग्वैभव
तेथे जाइल ही खपून, " म्हणसी " माझी जरा चिवचिव "?

छे, जीवा चिमण्या, जिण्यांत न तुझ्या ह्या वाव वाग्वैभवा
नाही प्रश्न विवाद्य जीवन-कला-चर्चा जशी मानवा
पुष्पें जीं दिधलीं इथे उधळुनी श्रेष्ठांचिया स्वागता
जातीं पायदळीं, म्हणूनहि तुला नाही क्षिती तत्त्वतः

घेसी मात्र टिपून तूं टुणुटुणू हिंडूनिया भोवती
गुच्छांतील सुतें, तृणांकुर, कृमी जे पाकळ्यांसंगतीं
टाळ्या वाजविती मधेच जन, तैं जातेस तूं भुर्कन—
मानूं केंवि भिऊन ?—लूट करुनी, साहित्यिकां तुच्छुन !

बडोदें, १२-१-४६

* * *

## ५. पांथाचें मागणें

[ जाति दिण्डी

नको लावुन घेऊंस कवाडाला
नको बाहेरी लोटुं प्रवाश्याला
घडी-दो-घडिच्या येइ विसाव्याला
कृपण होशिल तूं काय तेव्हढ्याला

थाटलेलें ऐश्वर्य तुझ्या गेहीं
धक्का त्याला लव लावणार नाहीं
प्रतिष्ठेला तव बाध मुळिं न यावा
धोरणाने घेईन या विसावा

नको भाजी-भाकरी गूळ-पाणी
कष्ट माझ्यास्तव घेउं नये कोणी
असे पडशी माझिया स्कंधभागीं
तीच उतरुन घेईन उश्यालागी

तुझ्या पडवीच्या फक्त कोपऱ्यांत
मला ऋमुं दे एव्हढी एक रात

✣ ✣

जया अपुलें उद्दिष्ट नसे ठावें
पतंगासम जो ख़ात हेलकावे

म्हणुनींच धावलों तिथे निमित्तासवें
तें सूतहि आधाराला स्वर्गास जावया हवे
व्हायची भेट ना तुझी कधीही पुन्हा
नियतिनें भीक घालावी कां धरुनी करुणा, कुणा ?
अवशेष जिथे नांदती
तेथेच भाव गुंतती
तीर्थशी वास्तु होय ती
म्हणुनि त्या स्थळीं
शांतवूं नये कां जीवा तेथल्या चर्चुनी धुळी ?

मुंबई, २०-७-४७

* * *

# ७. रुप्याची धारा

[ जाति—अभिमन्यू

रुप्याची धारा
धारा कोसळते
दरीमधि आणि लुप्त होते

जणू ही रेषा
रेषा भाग्याची
उमटुनी पुन्हा दडायाची

एरव्ही सारें
सारें कान्तार
दाटलें सभोवती घोर

कधीं तरि पुढती
पुढती सरितेचा
तयांतुनि ओघ निघायाचा

भवतिचे मग ते
ओहळ आणि झरे
तत्पदीं लोळतील सारे

घेउनी संगें
असे आप्त-गोत
बळावत फोफावत गात

कधी उन्मादें
करित मोड–तोड
उलथुनी देत जुनें खोड
पाजुनी शेतें
फुलवुनि उद्यानें
बुडवुनी निवारुनी दैन्यें

क्षेमकर अन्तीं
ऐसा सरितेचा
जगावर ओघ वहायाचा

अहमदाबाद, २५-८-४७

* * *

## ८. बालका, असाच झोप

[ जाति–अष्टग

बालका, असाच झोप; घाइ कां उठावया ?
ह्या जगांत ह्यापुढे न सोय गा निजावया.
पाळण्यांत जोजवीत
अंगाई तुजसि गात
नेम काय जायचें उद्याच भाग्य हें लया !
लाविला सुरम्य बाग
परि न हुंगिले पराग
तोंच आग लागली चहूंकडून रे तया.
स्वप्न सफल ये करांत
म्हणुनि मोद अंतरांत
तोंच शाप तें ठरेचि ! काय ह्या म्हणूं नया !!
एक एक बघ पिशाच्च
करित विकट हास्य नाच
दंग आपुलेंच पुण्य तुडविण्यांत थयथया.
जाति वंश धर्म रुधिर
हा विचार न करि बधिर
स्वप्नसृष्टि तोंवरीच संभवे निरामया
चालुं दे म्हणून झोप
जों न हा मनीं प्रकोप
जाणतेपणीं मिळेल ही न ईश्वरी दया

पुणें, २-१०-४७



* * *

# ९. हा बालक बसला कागद टरकावीत !

[ जाति भूपतिवैभव

हा बालक बसला कागद टरकावीत !
ते कोरे किंवा त्यांवर लिहिलें गीत
की नयनमनोहर रंगविलें गोपूर
कंचनी काय की झणकारित नूपूर
हा विचार नाही; नाही म्हणुनि फिकीर.
करण्यांत चिटोऱ्या रमला कारागीर !

ही रम्या नगरी साम्राज्याची भूषा
ही विश्वमोहिनी काय ऊर्वशी योषा
हीं लेणीं अथवा सुंदर ताजमहाल
करि विचार असला का विध्वंसक काळ ?
तो काळपुरुष लेवुनी रूप वेल्हाळ
निर्विकार बसला लावित काय निकाल
लागेल तयाच्या जी जी वस्तू हातीं
—ही आज कागदावरती वळली दृष्टी !

कोपुनी तयाची म्हणते माय—" खट्याळा
हा चालविला रे काय विनाशक चाळा ? "
परि मला वाटतें सांगावें जननीला
ही नको निखंदूं तव छकुल्याची लीला

कागदावरी ह्या लिहिलीं जातिल गाणीं
परि करिल कंठगत भावें का तीं कोणी ?
जरि कुणी ह्यावरी चटोर लिहिलें कांही
चघळतील चात्रट मात्र तया लवलाही !

हा मिळेल कोणा जरी सावकारास
होईल खास हा ऋणकोला गळफास
लागेल हा जरी मुत्सद्यांच्या हातीं
ते करार ऐसे करतिल ह्याचेवरती
की उडेल त्यांच्यामधुनि अचानक भडका
जो ग्रहगोलांना देइल धडका धडका !
जरि कुणी ह्यावरी विश्वशांति–पाठास
कोरिलें ओतुनी पुण्य, काय विश्वास—
की पुण्याई ती धूर्त कुणी मुत्सद्दी
ठरवितील हातोहात मामुली रद्दी !

त्यांपेक्षा निरुपद्रवी खेळ हा नच का ?
चालुं दे बाळका ! नको ऐकुं ह्या यमकां

पुणें, २२-११-१९४७

* * *

# १०. ही पुन्हा न येइल वेळ

पुन्हा न येइल वेळ
गड्या, ही पुन्हा न येइल वेळ

आज वाहतें पाणी झुळझुळ
घे पिउनी भरभरुनी ओंजळ
परतुनि जेव्हा केव्हा येशिल
अरे कदाचित
रिता कोरडा
आढळेल हा हेळ !
मुशाफिर, पुन्हा न येइल वेळ.

सूर लागला — खिळले लोचन
जुळल्या तारा — उचंबळे मन
फुले चांदणें, पसरी मोहन
अरे गायका
वरचेवर का
जमतो ऐसा मेळ ?
गड्या, ही पुन्हा न येइल वेळ

फुलें भराभर 'परी' फाकिते
कांचन-मणिका-मुठी उधळिते
पिंगा घालित लकेर घेते

सर्वांगांचे
पदर पसरुनी
वरदानें ही झेल
कवे, ही पुन्हा न येइल वेळ

उत्कट व्याकुळ श्वास विलंबित
अधर–पाकळ्या झाल्या विगलित
अधीरतेनें बोटें कंपित
नको बुजूं रे
घे सावरुनी
ही झुकलेली वेल
खुळ्या, ही पुन्हा न येइल वेळ

व्योमीं शारद सायंकाळीं
गोपी करिती की जलकेली
तिथे तरंगति वसनें ढळलीं
न हो पराङ्मुख
लूट नयनसुख
जोंवर चालूं खेळ
गड्या, ही पुन्हा न येइल वेळ

भकास अवघें असुनी अंबर
विखुर उडुगणीं झालें सुंदर
तेवि जीवितीं हवेंच झुंबर

ह्यास्तव पणती
मिळेल ती ती
फुलवीं घालुनि तेल
गड्या, ही पुन्हा न येइल वेळ.

साधक बाधक काय पाहसी ?
काय आंकडे मोडित बससी ?
हिशेबांत रसनिर्मिति कैशी ?
उन्मादांतिल
प्रमाद स्रवातिल
अक्षय पुढति फुलेल
गड्या, ही पुन्हा न येइल वेळ

बडोदें, ८-१-४८

* * *

## ११. लोकमातांनो !

[ जाति–मुद्रिका

[ महात्माजींच्या अस्थींच्या विसर्जनाचे समयीं ]

ह्या अस्थि, चिताभस्म हें, निरविल्यावरी
घेउनी लोकमातांनो, न्या मिरवित वीचीशिरीं
जे तपुनी गेले साधुसंत भारतीं
आलात आजवर त्यांची दिनरात गात आरती
ती अभंगवाणी, ओवी ती, श्लोक ते
एकेक वीचि ही त्यांची संथाच नित्य घोकते
उपनिषदें, गीता, वेद आणि मंत्र ते
तुमचिया स्वरूपीं झाले जागते आणि वाहते
त्या घेउनि आपोशना
त्या करुनि शिरीं मार्जना
त्यामधे करुनि मज्जना
जी पुण्यश्लोकावली इथे नांदली
तिजहुनी ठेव सांभाळा ही त्रिभुवनमोलागळी

ह्या अस्थि, चिताभस्म हें, निरविल्यावरी
घेउनी लोकमातांनो, न्या मिरवित वीचीशिरीं
हें अहो भाग्य मिरवितां आणि नाचुनी
जयघोष महात्म्याचा त्या द्या उधळुनि काणिकांतुनी

व्रत आचरिलें जें कायावाचामनें
झेलिला मृत्युही अंतीं ज्या दिव्य व्रताकारणें
तें आकळलें अद्यापि कुठे भारता ?
अद्यापि जसाच्या तैसा तो रांजण गळका रिता
तो एक तयाचा खुनी !—
अवतार खुन्याचे जनीं
प्रगटले कसे ह्या क्षणीं ?
तरि चिताभस्ममंडिता तुम्ही वाहुनी
जा पिकवित शिवसौन्दर्या दुर्मतिंना प्रक्षाळुनी

ह्या अस्थि, चिताभस्म हें, निरविल्यावरी
घेउनी लोकमातांनो, न्या मिरवित वीचीशिरीं
जयघोषें सांगा भारतवासी जनां
हा सत्यव्रत अवतारा घे हरिश्चंद्र हो पुन्हा
स्वप्नांतहि दिधलें राज्य गाधिजा जरी
जागृतींत पूर्ती त्याची पाहिजे कराया तरी
जयघोषें सांगा भारतवासी जनां
हा मंत्रद्रष्टा घेई अवतार शिबी हो पुन्हा
आश्रयार्थ आल्या दीन कपोतास्तव
निज मांस अर्पिणें श्येना हा धर्म खरा वास्तव
जयघोषें सांगा अखिल जगांतिल जनां
हा विश्वकुटुंबी प्रेमी येशूच अवतरे पुन्हा
जे छळती, घेती प्राण, ठोकुनी खिळे
त्यां दया क्षमा दावा हो ! ते निमित्त भोळे खुळे !

वैराग्नि नको भडकणें
जगतांतिल समरांगणें
व्हावींत रम्य उपवनें
फुलवुनी स्वप्न हें दुथडी निज ऊर्मिनीं
"ॐ शांतिः शांतिः शांतिः" हा पाठ करा निशिदिनीं

पुणें, १२-२-४८

अनुक्रम 20209 वि:
क्रमांक 7337 नों: दि:

* * *

# १२. रूळ आणि माळ

[ छंद—देवीवर

आली आली म्हणतों तों गेली निघूनिया गाडी !
आणि उरलों तैसाच; सोबतीला माळ खडी !
क्षणभराचीं स्पंदनें बाकी सारीच जडता !
क्षणभराचें संगीत बाकी सारी नीरवता !
क्षण उत्कंठेचें सुख श्रेय-वर्षाव क्षणिक
एऱ्हींचें जीवित हें पसरलें निरर्थक !

परि क्षणाच्या त्या खुणा मोहरल्या अंगावर
देखूनिया म्हणे माळ— " भाग्यवान तूंच थोर
आलिंगनें कडाकडा चुंबनें तीं धडाधडा
क्षणभरांत सोहळा झाला साजरा केव्हढा
क्षण भोगाया प्रेमाचा गाढ उत्कट पाऊस
काय तिष्ठल्याचा शोक अरे, युगें अठ्ठावीस ? "

मुंबई, २२-२-४८

* * *

## १३. सुखरूप

[ छंद–देवीवर

माझी आवड–निवड कशी हेरूनिया राया
पुरवून अखंडित चालवितोस तूं माया
तुझ्या कौतुक–विनोदें चांदणेंच फुले धामीं
गोडी नवीन वाटते रोजच्याच घरकामीं
माझ्याभोंवतीं तुझिया चालतांना येरझारा
तलखलींत ग्रीष्माच्या ह्या लाभे विंझणाचा वारा
तुझे लोचन हिंदोल मला चढविती व्योमीं
तुझ्या फुंकरमात्रें मी बहरते रोमरोमीं
तुझ्यावेगळी होतांच चिंतनाच्या काननांत
तुझ्या सांगातीं हिंडतां तरंगते पुष्पकांत
तुझ्या गळां बिलगतां श्रेयकलश ओठांशीं
तुझ्या कुशींत घुसतां सारी निवे कासाविशी
दाही दिशांचीं कवाडें ठेविलींस खुलीं जरी
झालें खुशीनें पाखरूं तुझ्या प्रीतीच्या पंजरीं
नाही विचार वेगळा नाही आचार आगळा
सुखरूप ऐसा झाला माझ्या जिण्याचा सोहळा

चाफळ, ३०-५-४८

* * *

# १४. ती चिरंजीवता खरी

[ जाति–'वनराज'–किंचित् फरकाने

संपल्या क्षणें
संपल्या दिनें
हळुहळू संपतें जिणें

परि हवी कशाला क्षिती
घडलिया हातुनी कृति
जी भूषवि भुवनाप्रती
सत्कृतीगुणें
आयु मापणें
हा ध्यास मात्र घ्या मनें

अभिषेक शिवाच्या शिरीं
जलधारा संतत धरी
झिरपल्या जलाचें परि—
भाग्य केव्हढें
तेंच तेव्हढें
मिरवितें ' तीर्थ ' पदाविने

पूजेस्तव खुडलीं फुलें
निर्माल्यपणीं त्या मिळे
अमरत्व किती आगळें

जीं लतेवरी
डुलति दिनभरीं
तीं स्वभाग्य गणतीं उणें

विस्तीर्ण माळ पसरला
बहरला चिमुकला मळा
तो मळाच लावी लळा
जेथ तीं पिकें
पिकति जनसुखें
तेथेंच कवन कूजनें

दीर्घता नव्हे दीर्घता
जरि न ती लोकहितरता
क्षणिकता जरी सुफलिता
क्षणहि तो युगें
लंघुनी जगे
आपुल्या उपकृती–गुणें

जगताच्या बुरुजावरी
ज्या स्तवील युगवैखरी
ती चिरंजीवता खरी
हीच भावना
करित गायना
पाहून सरकतीं उनें

* * *

## १५. झोपलेला बालक पाहून

[ सुनील–शा. विक्रीडित

हा जागा असतां भयंकर चढे संताप माझे मनीं
दाटे कौतुक आणि गाढ ममता झोपेंत हा पाहुनी
'आहे हा पुरुषी स्वभावच असा' ऐसें कसें बोलतां ?
दावी रीति अशीच, घ्या बघुनिया, ही जन्मदात्री स्वता

"ह्याचे खेळ विचित्र ! हट्ट भलते ! तैसे उपद्व्याप ते ?
भावंडांसमवेत ना पळ जुळे ! कांहीं न कैसें पटे !
देई वस्तु कसा मुळीं न टिकुनी ! भंडावलें ! बेरड !"
हा जागा असता अशी करितसे जी सारखी ओरड —

ती ह्याची जननी, परंतु बघतां ह्यातें असा झोपला,
वात्सल्यें कुरवाळिते वरिवरी पाहून तोंडावळा.
"माझें बाळ गुणी किती ! उगिच मी कातावतें, बोलतें !"
ऐसें बोलत रुद्ध-कंठ टिपते ओलावले नेत्र ते.

आहे न्यायच हा ! जिवंतपणिंची टीकाई ज्याची कृति
येतां त्या चिर काळझोप, सगळे गातात त्याची स्तुति-.

पुणें, ७-९-४८

* * *

## १६. पत्राची पेटी

[ शुद्धसती छन्द

रस्त्याच्या कडेला उभी पत्र-पेटी
विटेवरी जैसा विठू जगजेठी
उनांत तापते पर्जन्यीं नाहते
वीज भिवविते परि न चळते
येऊं दे म्हातारा येऊं दे सुंदरा
तशीच सादर आल्या पोरा-सोरा
सोपविती कोणी निज कामकाज
निरोपिती कोणी निज हितगुज
असो महा राव असो महा रंक
सकलां वाटतो विश्वास निःशंक
कुणाचीं आसवें कुणाचीं कौतुकें
हृदय–शकलें भावना–मौक्तिकें
टिपुनिया ओठीं साठविते पोटीं
वाटे अगत्याची वेगळीच कोटी
काय तपश्चर्या ! केव्हढी थोरवी
लाभेल का कधी मज ही पदवी

१५-१०-४८

* * *

## १७. सुहाग

[ मोहिनी–छंद

कुणीं लावियेली माझ्या जिंदगीस आग
आणि दुर्बळाचा केला पुरा यज्ञयाग
शिकविला कांही कांही रोज मना त्याग
परि रोमरोमीं पूर्ण भिनेना विराग
फूत्कारत वारंवार आसक्तीचा नाग
चूड पेटवोनी आले – तेच महाभाग
धरूं कशासाठी तरी तयांवरी राग ?

व्यर्थ देत आलें ठेपे किडक्या बहाला
पोखरल्या कोसळत्या लिंपिले महाला
आणि वागवीलें पोटीं सर्वदा भयाला
अता दग्ध वास्तूवर बहरेल बाग
सुखकर सकलांना जयाचे पराग

भिडे उंबऱ्याची सीमा अता दिगंतास
उंच जाहलें कौलार गगनापरीस
बिछायतीसाठीं भव्य तिमिर प्रकाश
स्वयंप्रभावाचा आता जळेल चिराग
आणि खुपेल का माझें कुणा हें सुहाग ?

७-८-४१

* * *

# १८. कवि आणि कविता

[ पुष्पगुच्छ छंद

कविः—

नको तुझ्याशीं बोलणें
नको संगतीं चालणें
सारें बिनसलें जिणें
तुझ्यामुळे

तुझें कर्पूर—गौरांग
इंद्रधनूंतून ढंग
सौदामिनींत भ्रूभंग
देखियेले

तुझ्या पायधूळींतून
संभवतें तारांगण
सिंधु स्वेदबिंदूंतून
मोतियांचे

मद्यापेक्षाहि मादिर
सुधेपेक्षाहि मधुर
तुझें रूप धुंदकर
प्राशूं किती

तुवां केला न अव्हेर
ह्याच कृपेचा अहेर
ह्याच भावनेने फेर
    धरूं आलों

तुझ्या दिठींत रिघून
तुझ्या मिठींत विरून
व्हावें तुझेंच श्वसन
    ध्यास जडे

सारे म्हणून आराम
लाथाडून आणि धाम
घेई लंपट विराम
    तव पदीं

" काय होय हा आचार ?
निभावे का व्यवहार ? "—
—ऐसा करून धिक्कार
    गेले आप्त

' ब्रह्मानंदीं लागे टाळी
कोण देहातें सांभाळी ?'—
—थुंकियेल्या ह्याच चुळी
    तयांवर

जें जें बोललों उन्मत्त
त्याची आली हातोहात
प्रचीत, छे, प्रायश्चित्त
शीघ्र घोर

'कुणा हवें घरदार ?'
ऐसा काढितां उद्‌गार
भडकला वैश्वानर
घरीं दारीं !

'कुणा भय दारिद्र्याचें ?'
ऐसें वदतांच वाचे
साधनहि निर्वाहाचें
नष्ट होय !

'काय मोहिनी किरीटीं ?'
बोलायाचीच हें खोटी
तोंच खरेंच नरोटी
आली हातीं

जो जो उच्चारिला शब्द
त्याचा घुमून निनाद
आला माझीच पारध
करावया

माझे प्रलाप आलाप
व्हावे मलाच का शाप ?
काय अनन्यता पाप
होय तरी ?

देतां सत्त्वाची परीक्षा
झाली सर्वस्वाची रक्षा
आता मागतसे भिक्षा
सोड मला

मी हा कंगाल करंटा
तरी माझा उंबरठा
पतकरून परता
काय लाभ ?

कविता:—

हेंहि हृदय खोलून
करावया निवेदन
कोण माझियावांचून
स्थान तुला ?

आणि माझियावांचून
अंग-प्रत्यंगांचे कान
करूनिया अन्य कोण
ऐकणार ?

सारीं संपलीं आमिषें
सवें जळालीं किल्मिषें
प्रेमपिसेंच आपैसें
चक्रवर्ती

दूर झाले अंतःपट
सारे कोसळले तट
आता अखंड अद्वैत
विराजेल

तरि कशासाठी त्रागा
करिसी हा ? महाभागा !
अतुटचि स्नेहधागा
तुझा माझा !

तरि सोड सोड अढी
चल खेळूं ये फुगडी
जमे खरी आता जोडी
आकल्पान्त

विधुकरांचें सेवन
पुष्पमधूंचें प्राशन
ऋतूंवरी आरोहून
करूं चल

पुणें–चाफळ–प्रवास,
२२।२३-८-४९

★ ★ ★

## १९. अहल्येचा धावा

[ जाति——मनमोहन

चळतील आपुले चरण कधी ह्या कान्तारीं रघुवीर ?
पातल्या दारीं भ्रतारा
केवि आव्हेरील दारा ?
कशि समजू हा नट कुटिल देव करुं बघतो भ्रष्ट शरीर ?

मी अहल्या भाग्य हें जें
दुर्जनीं ह्या तेंच माझें
दुर्दैव ठरे ! नाशिती आपुल्या वमनानें हें क्षीर !

कपटपटुची दुष्ट लीला !
परि ठरे मी भ्रष्ट–शीला !
ज्ञानीच कां न हें घेति कलंकित पावन करुनि कुटीर ?

नाथ झाले पाठमोरे
संपलें सौभाग्य सारें !
ती अवगणना – छे, शापच ! की मज भेदुनि जाई तीर !

नाथ होतां पाठमोरे
कावळ्यांचें राज्य सारें !
कलकलाट कर्कश करुनि परजती चोची – विषखंजीर

अंगिच्या माझ्या गुणांची
अंतरींच्या मम कलांची
जाणीव कुणा ? पारखी भोवती परप्रत्ययी कीर !

अर्बुजांनी मर्कटांनी
करुनि जावें येथ घाणी
लडिवाळपणाही होइ जयांचा ओंगळ जुलुम जिकीर

जार कुलटा चोर भुरटे
करिति येथें भोग – वाटे
जातिचीच अपुल्या मज गणती, तर कसली शरम फिकीर ?

दुष्ट हेतू, समज खोटे,
माजलें हें रान मोठें
निःस्नेह जीवितीं रातकिड्यांची भिववी कटु किरकीर

काय हा वनवास भाळीं ?
हें विटंबन हृदय जाळी !
ही आग शांतविल कळवळणारा येथिल काय समीर ?

किर्र झाडी भोवताली
द्युतिशलाका ये न खालीं
कुरवाळिति गवतें; परंतु कुठवर पुरवे त्यांचा धीर ?

मेघमाला वरुनि जातां
द्रव तियेच्या येइ चित्ता
परि शापितेस कां पावन करुनी घेइ तियेचें नीर ?

मज कराया शापमुक्ता
शक्त दुसरा कोण शास्ता ?
या पतितपावना, लावुं नका हो आता पळहि उशीर

ही टळाया पायमल्ली
ही फुलाया भाग्यवल्ली
तव पायधुळींनें नटावया हें होइ ललाट अधीर

पुण्यशीला न्याय द्याया
न्यावया हा नरक विलया
आधार काय तो एकच सदया, राम-बाणतूणीर

सप्टेंबर, १९४९

* * *

# २०. हें मिळेल का कधी

[ जाति—महात्मवती

हें मला कधी का मिळेल वैभव सांगा ?
जेथलें सर्वदा हवामान अनुकूल
त्या स्थळीं स्वताचें विनयशील घरकूल
जवळून वाहती झरे सदा झुळझूळ
त्यामधे अपत्यें खेळत करिती दंगा

परसांत शेवगा, हदगा, केळी, लिंबी,
बहरते कापशी, जास्वंदी, डाळिंबी,
कोरांटी, कर्दळ, गोकर्णी, तिरसंगी
भुलवींत हमेशा माझ्या मानसभृंगा

कधि प्रपात दिसतो समोर कोसळतांना
किलबिलतीं घेतीं रानपाखरें ताना
लववितीं लहरलीं गवतें कौतुक—माना
कीं देति सलामी पायदळांच्या रांगा

पडवींत पहुडतां वळेल जिकडे दृष्टी
नवनवोन्मेषशालिनी दिसावी सृष्टी
उल्हास द्यावया थकल्या जीवा कष्टीं
प्यावया मिळावे उदयास्ताच्या रंगां

चमचमुनि चांदण्या चंद्राभवती भ्रमती
की गोप नि गोपी रमती कान्ह्याभवति
नाचती, मांडती लपंडाव, कुजबुजती
झिंगती, पांगती घुमत-घुमवितां पिंगा

मेघा न हिणविती जिथे धुराडीं मत्त
नच चहास बेचव करितें दैनिक वृत्त
त्या जीवितांतल्या संगीता स्वायत्त
नच नभोवाणिचा शापी धांगडधिंगा

जीवितीं कुणाला व्यापताप का चुकले
त्यांतुनीच कांही जीवितकोडें उकलें
स्फूर्तिला लागती विमानतळ परि असले
ती नीलकंठमस्तकींच उतरे गंगा

पुणें, ४-१०-४९

* * *

## २१. श्रेष्ठांच्या ह्या संगतींत

[ छंद—देवीवर

जवाहिऱ्यांच्या दुकानीं
हिरे मौक्तिक माणकें
माझ्या गरीबाच्या गेहीं
तैशीं शोभतीं पुस्तकें
आकाशाच्या झुंबरांत
तारकांच्या दिव्य ज्योती
ग्रंथपंगती ह्या गेहीं
दीपमालिका तेवती.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र.

ज्ञानी साहित्यिक श्रेष्ठ
जरी झाले दिवंगत
प्रतिनिधी हे तयांचे
मला जागती सोबत
जातां स्वधामास राम
ठेवी मागे हनुमंत
तैसे श्रेष्ठांनो तुमचे
दूत विश्वासुक ग्रंथ

अहो, एकाच समयीं
दर एक गोपीसंगें
वेगवेगळाल्या रूपें
कान्हा खेळलासे स्वांगें
आला आजही प्रत्यया
ईश्वरी तो चमत्कार
तुम्ही श्रेष्ठांनो करतां
हितगुज घरोघर

जो जो येतसे सान्निध
तयापुढती सादर
नव्हे, जिव्हाळ्याने गाढ
खुलें करतां अंतर
प्राणी गोंधळे जीवितीं
जणु सासुरवाशीण
तुम्ही करतां मायेने
मार्गदर्शन राखण
चमत्काराची मायावी
नाही भूलभुलावण
इषाऱ्यांत कोवळीक
आणि मनोविनोदन

मूर्ति देवळांमधील
        धातू–माती–दगडाच्या
देवपणा तयां लाभे
        भक्तिभावें पूजकाच्या
परि भक्त–निरपेक्ष
        येथे चैतन्य साकार
ग्रंथस्वरूपीं संचरे
        श्रेष्ठांचें ह्या जगावर

आणि पहा ग्रंथावरी
        अहो श्रेष्ठांची स्वाक्षरी
परोक्षता दूरता का
        येथ देवमूर्तीपरी ?
स्वाक्षरींत मूर्त होय
        भावनेचा साक्षात् क्षण
रक्तवाहिन्यांमधील
        होय चित्रित स्पंदन
अलोट हें मोल काय
        हिरे–मौक्तिक–माणकां ?
श्रेष्ठांच्या ह्या संगतींत
        का मी करंटा पोरका ?

पुणें, ६-१०-४९

* * *

# २२. उभा वारंवार दारीं

[ छंद–देवीवर

आल्या विरुद्ध दिशांनी
 स्टेशनांत गाड्या दोन
एकमेकींच्या बाजूला
 आणि थांबल्या येऊन
साहजीक आलों दारीं
 पहावया कोण कोण
पांथ आहेत चालले
 समोरच्या डब्यांतून
आणि खरेच दिसली
 मूर्त एक मनोहर
तोंच विरुद्ध दिशांना
 गाड्या निघाल्या निष्ठुर !
परतून बैसलों मी
 आपुलिया स्थानावर
तरी अंतरीं लोचनीं
 मूर्त घोळ मनोहर
दिसायाची फिरून ती
 शक्यता न कांहीं जरी
नवल की राहतों मी
 उभा वारंवार दारीं

लातूर, १-१२-४९

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रमांक २०५०७ वि:
क्रमांक ७३३७ नों: दि:

## २३. मार्गावरल्या ऊन-सावल्या

मार्गी दुतर्फा झाडीमधून
आले खालतीं किरण-झोत
मोटर माझी धावे त्यांतून
झापा टाकीत भर वेगांत
धांवत्या गाडीच्या कांचेवरून
मार्गावरल्या ऊन-सावल्या
जाती सरकून प्रतिबिंबून
जणू पक्ष्यांच्या झुंडी चालल्या
" ऊन-सावल्या दृष्टीपुढून
दौडत गेल्या ! "— उसासलें मन
परन्तु काय सत्य हें ? हाय,—
तयां लंघून
तयां त्यागून
आलों निघून
मीच न काय ! !
आणि फिरलों जेव्हा परत
ऊन-सावल्या मार्गी शोधत
शिणले मात्र
व्यर्थ हे नेत्र !
कधीच होता झाला सूर्यास्त !!

सातारा–पुण–प्रवास
१९-१२-४९

## २४. श्रेयाचे वाटेकरी

[ जाति–मुद्रिका

हें श्रेय येतसे आज माझिया करीं
माझीच लायकी सारी ही कशी म्हणूं मी तरी ?

धडपडत उडूं लागता
' किति शिणसी ' बोले पिता
लोटलीं तपें त्या अता
ते आशीर्वच मज कवच–कुंडलांपरी
माझाच पराक्रम सारा मग कसा म्हणूं मी तरी ?

ठिबकतां घाम वा टिपें
निज पदराने जी टिपे
जीमुळे शीण हारपे
ती माय सर्वथा जीवनदात्री झरी
माझीच थोरवी सारी जीवितीं म्हणूं का तरी ?

पाठीशीं बंधू खडे
मग दैव किती बापुडें
होणार तरी वाकडें ?
टवटवे स्वसाकौतुकें मनोवल्लरी
माझीच लायकी सारी ही कशी म्हणूं मी तरी ?

भागवून माझ्या भुका
सावरून माझ्या चुका
जागरूक माझ्या सुखा
विहरते घरीं सहचरी सुभगमंजिरी
हें श्रेय सर्वथा माझें मी केवि म्हणावें तरी ?

कधि कुठे हार जो मिळे
आणतां हरखती मुलें
गुणगुणत ' भले थोरले–
कधि मिळतिल ?' त्यांची होइ आस ही पुरी
माझीच कमाई सारी ही केवि म्हणावी तरी ?

किति पथीं दीपमालिका
स्नेहाळ नेत्रतारका
जाहल्या सदा प्रेरका
म्हणुनीच पोचलों न का इथे मंदिरीं ?
माझीच लायकी सारी मग कशी म्हणूं मी तरी ?

तैसेच घेउनी छिनी
ना मुलाहिजा ठेउनी
जे तुटून पडले कुणी—
आकार डौल हा कृपाच त्यांची खरी
माझीच थोरवी सारी मग केवि म्हणावी तरी ?

कुणि धरिती अब्दागिरी
कुणि पायघड्या अंथरी
जे रत्नाकर अन्तरीं—
ते सुहृद चढविती अलंकार मजवरी
माझींच वैभवें सारीं हीं कशीं म्हणावीं तरी ?

अज्ञात कुणी बांधव
असतीलहि माझ्यास्तव
किति करीत ईशस्तव—
की यशोमुकुट हा चढो माझिया शिरीं
माझीच थोरवी सारी मग कशी म्हणूं ही तरी ?

एप्रिल, १९४९

* * *

# २५. जाई निघून भ्रमर

[ छंद—देवीवर

राञ क्रमून संगतीं जाई निघून भ्रमर
ठेवूनिया हातावर एक सोन्याची मोहर
काय एव्हढीच होते तुझिया मी हिशेबांत ?
' पोटभरू ' म्हणून का तुझा धरिला मीं हात ?
होता अंधार म्हणून केलें तेव्हढें साहस
परि का न ओळखिलें सेवतांना श्वासोच्छ्‌वास ?
तुझ्या संग—सुखासाठीं केलें असभ्य साहस
म्हणूनीच कठोर का केलास हा उपहास ?
छे, छे, चुकलें ! आरोप करावा न तुजवर
खरोखरीच मोहना शोभतोस तूं भ्रमर
राञ क्रमून रसिक जाई निघून भ्रमर
काय भ्रमरा फुलाची असे फिकीर कदर ?

✦ ✦ ✦

तुझ्या संगसुखासाठीं आसुसलें तन मन
कधींपासून सांगूं का ? —आठव तें बालपण
बाळपणींच्या अल्लड वेलींवर लटकली
अनोळखी भावनेची अंधुकशी स्वप्नकळी
अवचित एके दिशीं जासी कुठे दूर देशीं
काय सांगूं ह्या जिवाची किती झाली कासाविसी

दिस, मास, वर्षे गेलीं लागे उमलाया कळी
अंधुक त्या स्वप्नामाजीं रेषा उमटूं लागली
फूल जाहलें कळीचें त्याची पाकळी—पाकळी
अर्थ कळून स्वप्नाचा धुंद फुंद आसुसली
आणि परतला माझा कालान्तराने भ्रमर
होई पाकळी—पाकळी त्यास भेटाया अधीर

✤ ✤ ✤

जातां येतां कितीकदा अंगावरून खेटून
देहीं आपाद—मस्तक झंकारला कण कण
तुझ्या दिसेना लोचनीं ओळखीचा मागमूस !
काय फुलल्या फुलांत नुरे कलिकेचा लेश ?
आसुसल्या तनें मनें परि मांडिला आकान्त —
' काय नेम कायमचा अंतरेल प्रिय पान्थ ! '
दाटे मनीं तगमग पेटे देहीं धगधग
शांति कोठली मिळाया वरसल्याविना ढग ?
आसुसल्या तनें मनें घोर मांडिला आकान्त —
' नको त्रिखंड—मोलाचा दवडूंस हा एकान्त ! '
रोमरोमांतून माझ्या ऐशी फुटली आरोळी
कोण देहातें सांभाळी घोर माजल्या कल्लोळीं !
दाटुं लागल्या काळोखीं एक चमके किरण
केला हिय्या ओघालागीं देहें बांधाया धरण
आणि काल अवचित पडे पदरीं वांछित
आलें फळास कीं माझें जन्मोजन्मींचें संचित

✤ ✤ ✤

होतें तिष्ठत पाहात आजवरी तुझी वाट
तुवां कराया भोजन होतें मांडियलें ताट
तुवां घेतले कवळ माझे निवले लोचन
तुवां सांडिलें उच्छिष्ट मिळे प्रसाद महान
ऐशा महाप्रसादासी तुळतांना खरोखर
काय नोहे कःपदार्थ तुवां दिलेली मोहर ?
तुझ्या हातची म्हणून पूजीन ही मोहोर मी
तुझें उच्छिष्ट सेवून मोहरेन रोमरोमीं
फिटे व्रताचें पारणें मिटे जन्माची ददात
ओळखीची घालूं बेडी भ्रमराच्या कां पायांत ?

एप्रिल, १९५०

* * *

## २६. देवाच्या दागिन्यांची चोरी

[ जाति–मोहिनी

दागिने तुझे हे देवा, नेउं नये कां मी ?
काय तुझें वैभव माझ्या येउं नये कामीं ?

उभा येथ भक्तासाठी म्हणति पांडुरंग
भक्त अन्नवस्त्राविण हा तुझा रे भणंग
रोजरोज बघसी तरि ही अचलता अभंग !
भार वाहसी तरि कां हीं भूषणें रिकामीं ?

आजवरी आलों तुजला म्हणत मायतात
भुकेजल्या पोटीं आलों कीर्त तुझी गात
काय कमाईस तुझ्या मम पोचुं नये हात ?
आइच्या स्तनीं अर्भक का चोर ? न्याय नामी !!

अर्पितात कोणी जें जें तुला भक्तिभावें
तुझ्या मालकीचें नच तें केवि मी गणावें !
तुझी लाज राखाया मी काय तें न न्यावें ?
समजुं केवि अससी उपरी तूंच तुझ्या धामीं ?

ऐवजास धनिका-गेहीं राहते तिजोरी
रूप तिचें उघडें जणु ही मूर्ति तत्र समोरी

काय ह्याविना तुज पदवी देउं तरी न्यारी ?
खुळे का न भजती तुज जे गणुनि जगत्स्वामी ?

अहो धनिक, ऐका, रत्नें अर्पितां प्रभूला
लाभ मात्र गुरवा तो ! तीं काय निर्गुणाला ?
आणि क्षुधार्तांच्या नशिबीं चोरपणा आला !
दान–भक्ति ऐशी तुमची सर्वथा निकामी !!

सांगली-पुणें-प्रवास,
२२-४-५०

* * *

## २७. उजाडणार केधवा

[ छन्द—देवीवर

उजाडणार केधवा
जगावरी मनू नवा
कुणासही कशाचीही
नसावयाची वानवा
आवडत्या उद्योगांत
मिळे प्रवेश राबाया
घाम—वाफांचा त्यांतल्या
मोह पडावा राजया
क्षुधार्तांचा जठराग्नि
उंच उंच हवेल्यांना
भडकूनी ग्रासायाची
भीति—शंका नुरे कोणा
हक्कासवे कर्तव्याची
जेथ जाणीव मीनली
आणि दानव थकले
त्यांत माजवीतां कली
अधिकाराची भोंवेना
गुणवंता अरेरावी
नाही सक्ती प्रतिभेने
ओवी अमुकाचि गावी

स्वप्नरंजनास नुरे
    नियंत्रण कसलेंच
स्वप्नें ऐशींच रंगती
    की न ज्यांचा कोणा पेंच
ढेपाळल्या कीडलेल्या
    करा कल्हई रोगण
ऐशा नकली शोभेचें
    नाहीं उरलें कारण
खरेपणाच्या सौन्दर्यें
    तळपतो जो तो प्राणी
वाणी करणी जयाची
    नित्य मांगल्याच्या खाणी
नाहीं सौन्दर्यास कांटा
    नाहीं विक्रमास ताठा
आत्मविकासाच्या गांवा
    जाती सकलांच्या वाटा
विहराया विश्वोद्यानीं
    कुठें बंदी पाखरांना
तैसाचहि मानवांना
    नच लागे परवाना
ऐशी निरोगी मोकळी
    दाही दिशां खेळे हवा
उजाडणार केधवा
    जगीं ऐसा मनू नवा

सप्टेंबर १९५०

* * *

## २८. माझे विधाते

[ जाति–दिंडी

येति माझ्या जीं उत्तरें मुखाने
सर्वथा तीं तुमचिया प्रसादाने
तुम्ही माझे हो धनी बोलवीते
संतवाणी प्रत्यया अशी येते

'अरे' म्हणुनी हटकलें तुम्हीं जेव्हा
बोल 'का रे' प्रगटला मुखीं तेव्हा
उगम शब्दांचा ज्या स्थळीं असेल
तिथे आहे तुमचीच लाथ चूळ

तुम्ही पाठीवर हात फिरविलात
राग–लोभाचें स्फुरण जें तयांत
रागदारीच्या त्याच बोल–ताना
रोमरंध्रांतुनि उमटल्या पहा ना

कधी तुमचा जाहला असा स्पर्श
क्षणीं तेणें दाटला किती हर्ष
कधी कनवाळूपणें पाहिलेत
आसवांनीं तों तुडुंबले नेत्र

कधी तुमची ऐकून आर्त हाक
कधी तुमचा वाटून जबर धाक

कधी तुमच्या लडिवाळ आर्जवाने
अहो गेलों चालून माळरानें

तुम्ही घुंगुर चरणांत बांधिलेत
सहज सजलों मी करायास नृत्य
तुम्ही लंगर घेऊन ठाकलात
उगारावी मी कां न तरी लाथ ?

काय झालें मी क्षुद्रमति ? कशाने ?
नव्हे तुमच्या कां कृपण कृपा–दानें ?
तुम्ही झाला हो जेधवा उदार
उचंबळला किति सिंधु हृदिं अपार

क्षितिज लंघाया स्फूर्ति संचरावी
लागते, हें तुमच्याहि नसे गावीं
पंख झडुनी गेल्यास, नवल काय ?
गारठ्यानें गोठून जाइ काय !

तुम्ही थापटतां मेण शाडु माती
हस्तरेषांनी नटे तुमचिया ती
तुम्ही ऐसे आकार घडविणारे
तुम्हिच दिधले हे रंग रूप सारें

आणि तुमच्या पुण्याइच्या प्रभावें
घटांतुन या विष अमृत वा झरावें
आपुल्यामाधि यापरी बंध नातें
तुम्ही माझे यापरी हो विधाते

२०-९-५०

* * *

# २९. कालवा आणि नदी

[ छन्द— देवीवर

कालवा—

पुलावरून कालवा धीर गंभीर चालला
ओघ नदीचा खालून वाहतसे खळखळा
कालव्याच्या चर्येवर उमटती सुरकुत्या
काय खालच्या नदीची दावतात तुच्छता त्या ?—

" नियंत्रणास शिस्तीस तुकवितां मान जरा
उच्च पदीं विराजतां येते ऐसें सहोदरा !
आणि हजारो हातांनी माझी कृपा वोसंडते.
माळावर बागाईत लाखो एकर पिकतें
जीवितांतील माझिया कणाकणाचा हिशेब
तुला पाहिजे असेल तर तपासून बघ.
तुझे चाळे निरर्थक किती तुझी अधोगति ?
कृतकृत्यता कोणती मिरविशील शेवटीं ?
माझें अखेरपर्यंत जिणें लागतें सार्थकीं ? "—
कालव्याच्या दिमाखांत हीच घुमे फुशारकी.

नदी—

खळखळणें नदीचें मनमोकळें हासणें
उपहासानें असल्या काय पडायाचें उणें ?

" अगा माझ्या बंधूराया नको करूं माझी कींव
लखलाभ असो दे ती तुझी तुजला थोरीव
मानवतें साधतें जें तुवां करावें खुशाल
प्रपातही जाणतसे हवी मानवा पखाल
खांद्यावरून भिस्त्याच्या पाठीवरून हल्याच्या
वावरतां पखाल का करी चेष्टा प्रपाताच्या ?
आखलेल्या जीविताची तरी मिराविसी ऐट
लाख पटींनी सुंदर माझें जीवित बेछूट

चालवींते बोलवींते तुझे धनी वेगळेच
तुझ्या वरद हस्तांना जखडले कांच पेच
वेडी-वाकडी चालीन परि स्वतंत्र राहीन
अवखळ सौंदर्याला मूढ म्हणतात हीन !
पंजरींच्या पोपटानें रिझवितां मालकाला
उगाच कां हिणवावें भिरभिरत्या घारीला ?
खळखळणें हें माझें अनुकारिती पैंजण
मोर कंचनी शिकती माझ्या चालीने नर्तन

कणाकणांत जें तुझ्या आहे सुफलितपण
तयानेच सहोदरा रसरसे मीहि पण.
उच्चपदस्थ आपुली विसरतो जात–कुळी,
आणि अवगणनेच्या टाकी आसांवर चुळी.
होते तुझ्या पुण्याईची मोजदाद बिनचुक !
यावी मोजतां पुण्याई ? काय ह्यांत गर्व सुख ?

आणि जासी कोठे तरी
किंवा पावसी विराम
माझी पावलो-पावलीं
तरी खुळ्या निखंदिसी
आणि दौलत दिमाख
संतचरणीं लोळून
पहा माझ्या काठावरी
तयांतल्या निर्माल्याने
वाळवंटीं दाटे कोठे
तेजें तयाच्या शरम
मीच निघतें न्हाऊन
पाहा माझिया सर्वांगीं

अन्तीं विरून जिरून
माझ्यामध्येच रिघून.
मात्र दौलत वाढती
काय माझी अधोगति
मिरवितें न पोकळ
होतें पावन निर्मळ.
किती समाधी देवळें.
माझें सौभाग्य उजळें.
थोर भाविकांचा मेळा
वाटे नक्षत्रमंडळा.
हरिनामाच्या गजरीं.
त्याच्या आलेख लहरी.

तेवि चांदण्यामधल्या
पडतील माझ्या कानीं;
माझें हृदय मंजुषा
सांग मग कोण तरी
ऐश्वर्याच्या ह्या पासंगा
तरी खुळ्या निखंदिसी
हीच अधोगति नेई
ह्याच्यापरतें तें काय
खळखळणें नदीचें
आणि चाले पांथस्थांना

प्रेमगोष्टी नौकेंतल्या
तुझ्या नशिबीं कोठल्या ?
हुतात्म्यांच्या अस्थींलागी
करंटा नि हतभागी ?
तुझी कोणती संपत्ती ?
काय माझी अधोगती ?
रत्नाकराच्या कुशींत
कृतार्थ नि सुफलित ? ”
गुणगुणतें हें गीत
कुरवाळीत चुंबीत.

२९-९-५०

* *

# ३०. व्याकुळ होतों मनीं

[ जाति—लीलारति

तें स्मरतां कालान्तरें
अजूनी व्याकुळ होतों मनीं
खिदळतात अवखळ खनाळांतुनी झरे
ते फेन-फुलांचे लेउनि गजरे तुरे
की नजराणे हे ज्यामधि मोती हिरे
चहुंकडे देति उधळुनी
आपुल्या बालिश· क्रीडांतुनी

कुरणांत काठच्या चरति गुरें वासरें
स्वच्छंद त्यांतुनी भ्रमती फुलपाखरें
बागडती, बिचकुनि वृथा, स्वैर कोकरें
कोवळीं उनें खाउनी
दवाची चाखुनि की वारुणी

त्या शिवारांतल्या माळ्यावरुनी कुणी
पाखरें हाकतां गोफण फटकारुनी
बावरून थबके हरिणी मज देखुनी
तें स्मरतां·कालान्तरें
अजूनी व्याकुळ होतों मनीं

१३-१०-'५०

* * *

## ३१. ऋजुता

[ जाति–घनराजी

ही असे सुकोमल कळी
घालिते मानसा भुली
की कांचन–मृगशावकासारखी
दावितसे किति हुली

सुळसुळू जेवि मासळी
थबकते धावुनी जळीं
ओघांत नदीच्या दीपकळी की
वाहत ही चालली

ही अनेकांचिया कटीं
अवलोकुन गमतें, पटीं—
ही काय चिमुकली हस्तीदंती
चालविती सोंगटी

मृदु मंजुल किति बोलते
साखरी काय गोल ते
हळुवार रेशमी तान गायिका
गळ्यानेच सोलते

अत्तरी कुपी खोलली
तीमधलि सुगंधावली
घरकुलीं काय जाहली
चालती–बोलतीच बाहुली

जरि फिरे उघडि-वाघडी
तरि गमते गोरस-वडी
ही मोत्यांच्या की लडी,
घातली की ज्योत्स्नेची घडी

कटि कुंभ सुधेचा कुणी
अप्सरा जाइ घेउनी
हा एक थेंब – जे तयांतुनी
सांडले हेंदकाळुनी

✣ ✣ ✣

लाविसी कुणासहि लळा
परि तोच मला आगळा
मम काव्यलतेला त्यांत लाभल्या
संजीवनिच्या चुळा

चिपळुण–पुणें–प्रवास
१६–१०–५०

* * *

# ३२. उभी एक मी टेकडी

[ छन्द–देवीवर

भकास ह्या माळावर उभी एक मी टेकडी
आहे भकासपणांत माझी माळावर कडी
नाही दुसरें कोणतें मिरवायास वैभव
येथ अशक्य अशक्य झाड–झुडूप–संभव
पावसाच्या येती सरी नच देहीं रंध्र ओठ
ईश्वराच्या ह्या दयेचे घ्याया घोटांवर घोट
अंतरास माझ्या यावा तरी कशाने ओलावा ?
कैसा अंकुरित व्हावा हिरवळीचा देखावा ?
येथ बांधाया मन्दिर आला कोणी न महन्त
परोपरींनी मजला पाठमोरा भगवन्त
ऐशी दुर्दैवी सर्वथा ! परि भाग्य एक मला
कैक सकाळीं जमतो येथ बालकांचा मेळा
दिसे येथून आगळें सूर्योदयाचें सौन्दर्य
झालें पायरी त्यासाठी काय कमी हें ऐश्वर्य !

पुणें-मुंबई-प्रवास,
२-१२-५०

* * *

# ३३ झालों भाग्यविधाते

[ जाति–महात्मवाति

आम्हीच आमुचे झालों भाग्यविधाते
हें पूर्व पुण्य ये फळास भारतमाते
झालों भाग्यविधाते

घेतला जयांनीं स्वातंत्र्याचा ध्यास
पतकरला त्यास्तव खडतर कारावास
कितिकांच्या बसले गळ्यांत रुतुनी फास
लाभली आज त्या मुक्ति चिरंजीवातें
झालों भाग्यविधाते

त्या यज्ञांतुनि ही ‘ घटना ’ ये आकारा
हा म्हणाच आम्ही निर्मियला देव्हारा
आव्हान मिळावें जयांतुनी परभारा—
“ येतसे नराचा नारायण व्हायातें ”
झालों भाग्यविधाते

ह्या देव्हाऱ्यामधि सिंहासन ‘ इतिहास ’
पुरुषार्थ चारही तिष्ठति चौ-खांबांस
भवितव्य घंटिका गाजवि घटिका तास
ध्वज डुले तिरंगी – उगम विश्वशांतीतें
आम्ही भाग्यविधाते

ह्यापुढती आम्ही कुणाचे न लाचार
सौंदर्य–सत्य–शिव हाच धर्म आचार
त्या भगीरथाचा अंतरांत संचार
भय शंकाकुल जे कोणी तेच करंटे !
आम्ही भाग्यविधाते

साक्षात जान्हवी येइल उतरुन खाली
'काळी' च येथली पांचाळीची थाळी
पीडितां निवारा इथे मिळे गिरिखाली
नव मंत्र घोषिती द्रष्टे येथिल नेते
आम्ही भाग्यविधाते

पुणें, १३-१-५१

* * *

वाचनालय ... स्था
अनुक्रमांक 20249 वि. ...
9339 नों: दि:...

# ३४. हा कोरा कागद

[ जाति–भूपतिवैभव

हा कागद आहे तुमच्यापुढती कोरा
त्यावरी कांहि तरि अशीं अक्षरें कोरा
की काळसिंधुच्या वरुनि वाहतां लाटा
जातील तयांच्या मुळीं न झिजुनी कोरा

हा कागद आहे तुमच्यापुढती कोरा
की पर्वत हा–त्यामाजीं लेणीं कोरा
तरि विहार थोडा तरी कराया त्यांत
आसमंतांतला येइल जनगण सारा

हा कागद आहे तुमच्यापुढती कोरा
त्यावरी मनोहर ऐसें कांहि चितारा
की खिन्नांच्याही अंत:करणामधल्या
झंकार कराया लागतील झणिं तारा

हा कागद आहे कोरा तुमच्या हातीं
त्यावरती कोरा ऐशा निज अनुभूति
कीं पथिकां होइल ध्येयाचा ध्रुवतारा
वादळीं सागरीं रणीं संभ्रमीं रातीं

हा कागद आहे तुमच्यापुढती कोरा
त्यावरी कांहितरि असेंच उज्ज्वल कोरा
कीं भावि पिढ्यांच्या पुढे कितीतरि शतकें
कागदास यावा या मिरवाया तोरा

हा कोरा कागद, धरा तयाचा धाक,
करि उघड मुठीमधि असे लाख वा राख
बडिवार तयाने गावा तुमचा पुढती
ऐशाच रीतिने तयास लावा टाक

हा कोरा कागद शिवकार्मुक की समजा
वा टाक–बाण लावणें तया हो गमजा
त्यानेच उठावें जो दाशरथी राम
भूसुतेस नच त्या वीस भुजांच्या गरजा

हा कागद आहे कोरा तुमच्यापुढती
ऐशींच उमटवा पदें त्याचियावरती
की गंध–फुलांदिक लाभुनिया उपचार
होईल तयाची देव्हाऱ्यामधि वसती

हा कोरा कागद ‘ सौंदर्याची मूर्ति ’
हा कोरा कागद ‘ मांगल्याची वसती ’
हा कोरा कागद ‘ सत्याचेंच निशाण ’
द्या तयाप्रती हो एकमेव ही महती

ना तरी राहुं द्या कोरा आहे तैसा
सन्मान तयाचा त्यांतच होइ पुरेसा
पांढऱ्यावरी त्या काळें करण्याहून
तें कोरेपणही होइल त्याला भूषा

१३-२-५१

* * *

## ३५. छोकरा असे बिलंदर महा

[ जाति—घनराजी

हा दिलीप अमुचा पहा
छोकरा असे बिलंदर महा
तो कनिष्ठ आहे खरा
परि वरिष्ठ जुलमी पुरा
छळवादी अगणित तऱ्हा
अति अवघड सांभाळणें तयाची मर्जी, कांही करा !

प्रतिपदीं मला नाचवी
कल्पना हरघडी नवी
काढुनी सतत राबवी
मज विसंबे न, मजविना कशांतहि तया न कांही चवी

गुरु मीच द्यावया धडे
घासही मजविना अडे
झोपणें तरी मजपुढे
बिनसेल कशाने कळे न,—कळतें जेव्हा घेइन कडे

जरि रडतो काढुनि गळा
वाटोळा तोंडावळा
विसकटे न त्याची कळा
रडव्याहि मुखा चुंबितां माधुरी,—तीं नच मधमोहळा

तो तोंड भरुनि हासतो
जणु पोटांतुनि उकळतो

की हर्षेंचि ओसंडतो
हासणें तयाचें अम्हां अलौकिक महोत्सवाचि वाटतो

काधि अवचित तो निसटुनी
मोटरीमधे बैसुनी
ती सफाइने अंगणीं
ऐटींत फिरवितो तास–तास, ना गणुनि ऊन अडचणी

तो कुरूपतेला बुजे
जें सुंदर तें पाहिजे
करि तयाशींच हितगुजें
जें कलाहीन त्याविषयिं त्याचिया तिरस्कार मनिं रुजे

भेटीला येतां कुणी
बैसतो मला खेटुनी
अर्थ एक ह्या वर्तनीं
मज घेऊन जातिल, भयें या बसे कब्जा बळकावुनी

तो छळतो सकलांप्रती
खोड्यांस न त्याच्या मिती
त्यापुढें हात टेकिती
जरि पिटुनि काढिती मायतात, तरि अजिंक्य तो शेवटीं

सारखी करी भुणभुण
हाहि एक त्याचा गुण
किति सांगुं आणखी पण
ह्या कवितेसहि होइ तयाची भुणभूणचि कारण

दिल्ली–पुणें–प्रवास,
१९-३-५१

* * *

## ३६. शृंगारिले प्राणी, शृंगारिले जन

[ छन्द-देवद्वार

शृंगारिले दंती, शृंगारिले घोडे,
सोनियाचे तोडे त्यांच्या पायीं
भरघोस माळा, भरजरी झुली,
तेणें त्यांच्या चाली बिथरल्या
आणि सुरू होता वाद्यांचा गजर
होती अनावर बुजुनीया
मिरवणुकींत माजला गोंधळ
होई धावपळ प्रेक्षकांची
तुडवा-तुडवी, चेंगराचेंगरी,
दाणादाण सारी भोवताली
चालविते धनी झाले असमर्थ
उडाला अनर्थ अवचित

तैसेच नटले श्रीपती नृपती
माथां झळकती शिरपेंच
मकरकुंडलें कानांत शोभती
कंठांत लोंबती रत्नहार
भालदार भाट ललकारतात
चढे मस्तकांत धुंदी त्यांची

नृप–श्रीपतींची चाल–चलणूक
केवि स्वाभाविक राहणार ?
युक्तीचें बोलणें, मतीचें सांगणें,
ऐकूं केवि येणें धनमदा
पावलोंपावलीं चिरडले जाती
जनपद किती आसमंतीं

शृंगारिले प्राणी, शृंगारिले जन,
दोनीहि समान नव्हेत का ?

कारवार प्रवास,
३-५-५१

* * *

# ३७. कोसळती हे अनेक पाझर

[ जाति–सूर्यकांत

कोसळती हे अनेक पाझर कडेकपारींतुनी
की अवतरती धुर्जटीचिया जटेंतुनी स्वर्धुनी
की अवखळ बालकें आइच्या गळां सुखें बिलगती
खांद्यावरुनी मांडीवरती घसरगुंडि खेळती
प्रतिभाशाली कुणा कवीची स्फूर्ती आंदोळली
ओघवती ह्या वैखरिने की लिहितो कवनावली
गिरिरायाच्या मुकुटाला की समोवार लावल्या
त्याच काय भरघोस लोंबती मोत्यांच्या झिरमिळ्या

देखुनि की नच वसुंधरेच्या गळ्यांत फुटका मणी
अनंत हस्तें सर मोत्यांचे तिला घालितो कुणी
वसुंधरा की एकान्तामधि रूपातें आपुल्या
बघते मुकुरीं कुतुकें लेवुनि हार नि मुंडावळ्या
मधुनी-मधुनी पर्जन्याच्या येति सरीवर सरी
तिज बुजवाया कुणी उधळि त्या अक्षताच की शिरीं
किंवा देखुनि तिची तलखली झालेली दरादिनीं
ममतेने जी गोंजारितसे तिला तीर्थरूपिणी—
असीम हेलावली तियेच्या वत्सलता अन्तरीं
समोवार ती स्रोतांतुन की वोसंडे ह्यापरी

किंवा देखुनि सस्यश्यामला अता क्षुधापीडिता
हीं धान्याचीं कोठारें कीं कुणि झाला फोडिता.
ह्याच गुन्ह्याचा पातशहाने जाब मागतांक्षणीं
सरसावुनि कांबळी करूं ये विठू पाठराखणी--
विनवित 'घ्या हो भरपाईचे दाम मोजुनी धनी'
दरबारामधिं कलदारांचे पाट वाहवी झणीं

किंवा पंचाननें फोडिलीं जीं गजगंडस्थळें
त्यांतुनि गळती ठायीं ठायीं हीं का मुक्ताफळें
किंवा करितां वज्रमुष्टिनें कुणी मूर्तिभंजन
भळभळ गळती लपवियलेले रत्नांचे रांजण
गिरिकंदर–दशकंधर वांछी उचलाया शिवधनू
वीसहि त्याच्या स्फुरती झटती भुजाच कीं ह्या जणू
कीं अवमानित सह्याद्रीच्या हृदया गेले तडे
त्या प्रत्येकीं आव्हानांचे बोल उफाळति खडे

कीं जगताच्या कल्याणास्तव खपले संत-मुनी
विशालता आत्म्यांची त्यांच्या अखिल मेघ व्यापुनी
द्रवते अजुनी मानवतेची विटंबना देखुनी
पाट तयांच्या अश्रूंचे हे पडती स्रोतांतुनी

१६-८-५१

* * *

## ३८. नातवाच्या बारश्याला

[ वृत्त स्रग्विणी

आज बाळा तुझें होतसे बारसें
त्यक्त मी निर्धना; तेथ यावें कसें ?
श्रीपतींच्या सुना, कन्यका, भामिनी
घेउनी चांदिचीं बोंडलीं खेळणीं
यायच्या बालका तूझिया कौतुका
का नकोशी करूं तेथ दाटी फुका ?

बारश्याला तुझ्या भर्जरी रेशमी
अंगडीं टोपडीं कोठलीं आणुं मी ?
मी शिलाईवरी पोट माझें भरी
आंसवांसंगतीं खातसे भाकरी
ऐशिया सर्वथा निर्धनाच्या घरीं
रोजच्याला तरी का घडोतीं पुरीं !
फक्त चिंध्याच रे गांठिला राहती
ही तयांची उशी मस्तकाखालती
त्यांतल्या त्यांत ज्या भर्जरी रेशमी
गांठवोनी तया धाडितें आज मी.

यायचे आज बाळंतिणीला विडे
बाळलेणीं किती, द्रव्यही रोकडें,
तेवि द्रव्यें सुगंधी किती मोहक
कोमलांगा तुझें वाढवाया सुख

त्यांत चिंध्यांचिया चिर्गुटांचें तुला
मोल ह्या काय, गा श्रीपतीच्या मुला

क्षुद्र चिंध्याच की ह्या म्हणूं दे कुणी
तेवि वाटोत हीं चिर्गुटें निर्गुणी
चिंधिला चिंधि एकेक ही जोडितां
अंतरीं सारख्या ऊर्मि हेलावतां
सर्व टाके शुभाशीर्वचांच्या सवें
घातले जागुनी सक्त भावें-जिवें
तेव्हढे जीवितांतील माझे क्षण
गोंविले येथ प्रत्येक टाक्यांतुन
हात घामेजले, आंसु ओसंडले
वास धाग्यांप्रती तेच की लागले.
काप माझ्या जिण्याचेच साक्षात् असे
धाडुनी साजरें मी करी बारसें.
घोळक्य मार्जि त्या झोपल्या-झोपल्या
जाणुनी कां न घेशील हें सोनुल्या
तूं परब्रह्म अंगुष्ठमूर्तीच की
बाळ गोपाळ गोविंद तो तूंच की
कांबळीची असे ज्या तुला आवडी
त्या तुला का रुचावी न ही गोधडी ?
येसि माझ्याच की तूं स्नुषेच्या कुशीं
चंद्रकोरीस मी अर्पितें ही दशी.

भिवंडी
१८-८-५१

* * *

# ३९. सुस्वागत

[ जाति—दासी

या हो या सर्व तुम्ही. सुस्वागत सर्वांचें
करित जिवेंभावें मी;—वरकरणी नच वाच—
याल तुम्ही व्हाल तरी मजलागी उपकारक
मग हेतू धरुनी या किंवा या निर्हेतुक

या हो या सज्जन, व्हा तारांगण गेह—तमीं
अडखळल्या पावलांस दाखवाल वाट तुम्ही
या उदारचरितांनो, तुमची शुभ पायधूळ
क्षाळिल ती क्षणिं माझी क्षुद्रवृत्ति स्वार्थमूळ
ठाकतांच कर्मवीर कोणी मम अंगणांत
होइल मम निष्क्रियता निमिषार्धी भस्मसात

सर्व–सौख्य–संग–परित्याग कुणी करणारा
क्रमितो पथ बघत एक ध्येयाचा ध्रुवतारा
तो दारावरुनी मम जाइल हो जरि केवळ
त्याच्या शुभ दर्शनमात्रेंचि मला येइल बळ
सुखलंपटतेचे मग हे साखळदंड तुटुन
भिनलेली भीरुताहि जाइल हो विरघळून
खळखळत्या अश्रूंनी त्याचें पदसंवाहन
करुन शुचिर्भूत सबाह्यान्तर मी तरि होइन

साधुसंत येति घरा तोचि दिवाळी दसरा
हर्षभरें त्याच असे सादर मी परि इतरां

शांत जळीं दगडफेंक तारांवर वा टिचकी
येणारे देतिल मज अनुभूती ह्यांपैकी

या हासत किंवा या रागावत, या दुर्मुख
आगमनें तुमच्या हो द्विगुणित मम होई सुख
या दुर्मुख शोकमूढ, होइन मी कनवाळू
सांतवना मुख तुमचें मी सजेन कुरवाळूं
या हो कोपिष्ट कुणी दुर्वासासम अतिथी
अजमावुनि घ्या माझ्या थाळीची अंत–मिती

या मतलब–साधूंनो, जा करुनी आणि लूट
पाहुन संतुष्ट तुम्हां जाणवेल मज न तूट
या खुशाल रिक्तहस्त, कृपण असा रंक नीच
होइल जी ये–जा हो देइल मज दान तीच
या घ्याया ओरखडे, करतिल मज ते जागृत
या ठिणगी टाकाया, चेतवील वन्हीप्रत
द्या आशीर्वाद कुणी, करित कुणी या कौतुक,
त्या प्रसादतीर्थास्तव मी क्षुधार्त किति उत्सुक
अथवा या आणि मला द्या खुशाल शाप–शिव्या
प्रेरक मज होतिल त्या शुभ कार्या नित्य नव्या
या छिद्रान्वेषी हो अथवा मज हिणवाया
का न त्यांत मजविषयीं हितबुद्धी वा माया ?
या दुर्जन, दुर्वचनें करुनि बघा मज अपाय
पाहिन तरि परिवर्तन घडल्याविण जाल काय ?

येउनिया जाल कुणी माझी उडवून झोप
जाल कुणी अंगणांत नूतन रुजवून रोप
ऐकवाल निज कोणी विक्रमयश या बधिरा
घाल उठावण आणिक थिजलेल्या मम रुधिरा
येतिल कुणि गात गात आपुलीच वा कविता
पल्लविता होतिल मम तेणें निष्पर्ण लता
न कळत जातील कुणी करुनि कांहि उपकारा
मागितल्याविण जातिल देउनिया करभारा

याल कुणी जरि मुरकत अन् फेकित मृदु कटाक्ष
वक्षीं ह्या विद्ध जाल ठेवुनिया गोड साक्ष
याल कुणी दाखवीत लोभस जरि हावभाव
भावसिंधुवरि डुलेल त्यांची कमनीय नाव
याल कुणी नवलाचे ऐसे कुजबुजत बोल
की ज्यांतुन स्वप्नांचे जन्मतील भुवनगोल

किंवा या विष घेउन, घेइन त्याचेहि घोट
क्षेमास्तव इतरांच्या होणें मज नीलकंठ
क्षेमास्तव इतरांच्या होवो सर्वांग—दाह
मग न मिळो इंदु शिरीं गंगेचा वा प्रवाह
ऐसें समृद्ध जिणें यज्ञयागपरिपूरित —
व्हायास्तव सकलांचें या गेहीं सुस्वागत

पुणें—मुंबई—पुणें प्रवास
४।५-१०-५१



* * *

# ४०. करील धरणी सहन कोठवर

[ जाति—पादाकुलक

दगड काढले खाणींतुन वर
रचिलें मंदिर इमले भरभर
राजधानिचा दिमाख देखा
मिनार चुंबिति सहजीं अंबर

खडेहि खाणींमधे गवसले
द्युतीस ज्यांच्या तारे दिपले
भडकुनि त्यांस्तव हाव अनावर
रणांगणीं दळभार धडकले

वीरहि वांछिति ते नजराणे
त्यांनीं नटल्या रमणी राणे
मदिर-मत्त थैमान तयांचें
त्रिभुवन तेणें अखिल दणाणे

करील धरणी सहन कोठवर ?
तिच्या कुशीचे कलिजे हे तर !
तिच्यापासुनी छिनून घेतां
आणि नाचतां तिच्या उरावर ?

असो कोळसा असोहि गंधक
असो दगड वा हिरा नि माणिक
मेंगॅनीज असो वा सैंधव
जननीला प्रिय सकल अमोलिक

शोकाविव्हला कांपे थरथर
तिचें दुभंगे अखेर अन्तर
गडप भराभर कुशींत होती
मिनार, इमले, शहरें, डोंगर

नागपूर,
९।१०-१०-५१

* * *

## ४१. प्रेक्षक

[ शुद्धसती–छन्द

पाहतो समोर मानवी व्यापार
विकार, विचार, क्रीडित, संगर

कुणाचीं चुंबनें अश्रूंचीं सिंचनें
कुणाचीं कूजनें कुणाचीं स्पंदनें
हिंडतात कोणी नदीच्या कांठानें
तुडवीत रानें झिंगून प्रेमानें

कुठे कुजबूज करी गुदगुल्या
तिनें रोमरोमीं मोहरती कळ्या
कुठे गाढ मिठी कुठे ताटातुटी
संशयाचे पोटीं कुठे कटकटी

रंगली दिवाळी भडकली होळी
कुठे फुटे गोळी करुण किंकाळी
मनुष्य लाजवी पाषाणा सैताना
स्त्रीची विटंबना घालिते धिंगाणा
कोणी चिवडती क्रूरपणें गात्रें
देखतांच फाटे ऊर, रक्त गोठे

कुणी वणवण करी रात्रंदिन
अन्नवस्त्राविण गाठी वळचण

हात न हालती श्वास न चालती
तोंडासभोवती माशा घोंघावती

आणि कुठे पेले भरले फेसाळ
संगें ललनांच्या लीला लडिवाळ
किंचित भिंवया करतांच चाळा
किती कलिजांचा होई चोळामोळा
रुमझुमतांना पायींचे पैंजण
त्याच पदीं घेती घायाळ लोळण

ऐसे भराभर अनंत व्यापार
चलच्चित्रपटीं पाहतो समोर
मना रिझवितो बैसून अंधारीं
चित्रपटांतील आणि नर–नारी
जरी न तयाचे सगे वा सोयरे
तथापि पावतो तयांच्या व्यापारें
हर्ष, शोक, खेद असहायपणें !
अधिक तें सरतें
न्यून तें पुरतें
करूं न शकतो अगातिकतेने !

❖ ❖ ❖

आणि हा प्रेक्षक कोण समजतां ?
'जगाचा नियंता'
'जगाचा नियंता'

म्हणून जयाला अहो संबोधितां
तोच की ईश्वर दूर कोठे तरी
आराम–खुर्चींत बैसून अंधारीं
पाहतो नच का असहायपणें
विश्वाचे व्यापारः– जीवांचें जगणें
कुढणें, लढणें, गंजणें, मरणें !
मना रंजवितो अगतिकतेने !

१८-११-५१

* * *

# ४२. तरी तो निर्धन धनाढ्यहि

[ छन्द–देवद्वार

उत्तम वेव्हारें जोडियेलें धन
    पावलों ‘ श्रीमान ’ पदवीला.
कानांत भूषणें, घालूनिया गळां
    मोती–रत्न–माळा मिरवितों
बघा ह्यांचे पैलू, बघा ह्यांचें पाणी,
    ऐशी वाखाणणी होत राही
डौलदार घाट, मांडणीचा थाट
    लोक दिपतात देखूनिया
कौतुकाच्या दृष्टी, डोलणाऱ्या माना,
    पाहूनिया मना धन्य वाटे
उत्तम वेव्हारें जोडुनिया धन
    जाहलों श्रीमान खरोखर.

✧ ✧ ✧

परि मिरविणें जोडियेलें धन
    करंट–लक्षण नव्हे काय ?
कर्तृत्व-कमाई भूतकाळांतली
    करूं का हमाली आज तिची ?
नवीन बहर येईना म्हणून
    करूं परिधान निर्माल्य कां ?

खांडवे पडल्या डोहालागी थोर
नदीची का सर वाहणाऱ्या ?
जोडियेल्या धनामाजीं नवी भर
पडेच ना जर, रंक तो की
तींच तीं कंकणें भूषणें घालणें
म्हणजे भक्षणें शिळेंपाकें
शिळ्यापाक्यावर ज्याची गुजराण
तरी तो निर्धन धनाढ्यहि !

९-७-५२

* * *

# ४३. शिवारांतल्या मुशाफिरास

[ जाति–भूपतिवैभव

कां मुशाफिरा तूं इथे भटकसी आता ?
हा ओहळ होता एक काळ जरि गाता
  कां देसि कुठे तरि वृथा कान अवधान ?
  यायचें ऐकुं का विरलेलें तें गान ?

कां कलंडसी तूं उगाच येथे पांथा ?
ती काठावरची हिरवळ कोठे आता—
  जीमुळे न खुपणें रुक्ष वाळु वा गोटे
  हिरवळीहुनी ती हिरवी संगत कोठे ?

कां वृथाच रेंगाळसी इथे तूं पथिका ?
निष्पर्ण शुष्क हीं झुडुपें कुरवाळुनि का—
  त्या लपाछपीच्या मिळेल सुख खेळाचें ?
  एकलाच की तूं आज, विसरशी कैचें ! !

ती हीच दरड रे, जरि ढासळली कांही
कां भरभर चढुनी जायाची ही घाई ?
  तीवरुन कितीही जरि भिरभिरली नजर
  मृगजळाविना दिसणार कोणती लहर ! !

हा तोच भव्य रे आंबा साखर–गोटी
[ साखरेहुनी परि जिच्यांत गोडी मोठी
ती कांदाभाकर तुजसी ज्याच्याखाली
कधिकधी मिळाली ] त्याची धरुन डहाळी—
तिष्ठसी रेलुनी उगाच का बुंध्यास ?
कां हारपल्या त्या स्वप्नावलिचा ध्यास–
घेऊन, शोधिसी शेरडूक, ती गाय ?
ही खार दाविते तुज अनुकंपा, हाय !

२३-७-५२

* * *

संग्रहालय ठाणे स्थळ
अनुक्रमांक 20229. वि. 3/44
क्रमांक 9333..... नों: दि: 5/1/81

## ४४. कागदी फुलांनो

[ जाति–भूपतिवैभव

कागदी फुलांनो, करा मोकळें मेज
अम्लान अजुनि जरि तुमचें रंगित तेज
हा गुच्छ मनोहर, गजरा, रुळती वेल—
किति हिरवे, पिवळे, तांबुस रंग तजेल
ही तजेलदारी परि केवळ रंगांची !
नच अंगभूत ही, नव्हेहि ताजेपणिंची !

दाटींत जयांचीं चाळींतून बिऱ्हाडें
लावतील कोठुनि भवती ते फुलझाडें ?
जागा न टीचभर तुळसहि लावायास
मरतेच तयांची बागफुलांची हौस
कागदी फुलांनीं करिती ते भरपाई
हतभाग्यांचा त्या मीहि नव्हे का भाई ?

म्हणुनीच आणुनी तुम्हांस वाडेंकोडें
हें बिऱ्हाड सजवुन दैन्य वारिलें थोडें
विसकटे न तुमचा सहजासहजी डौल
लवकरी न तैसे होती रंग मळूल
वाहवा मनाशी करित कलावंतांची
जपणूक आजवर कुतुकें केली तुमची

वैयर्थ्य आज परि सजावटींतिल कळुनी
बाहेर देतसे तुम्हांस भिरकावूनी
टवटवीत असती बाग–फुलें फुलतांना
अविलंबें होतीं परि निर्माल्य पहा ना
निर्माल्यपणा जरि तुम्हां न तसला ग्रासी
निर्माल्यपणा जन्मतांच तुमच्यापाशी

जरि तुम्हां घातलें न्हाउं अत्तरामाजी
का भृंग घालतिल तुमच्याभवतीं रुंजी ?
मधुबिंदु ठेविले तुम्हांत जरि शिंपून
यायचे तयांना मधुप काय लोभून ?
जरि आणि लोभुनी बसले, क्षणभर मानूं
तुमच्यांत कुठे ते स्त्री–पूं–केसर रेणू —
वाहुनी तयांनीं पंखांवरुनी न्याया ?
छे, वांझ अशी ही कलाकुसर तरि वाया !

वैयर्थ्य आज हें सजावटींतिल कळुनी
बाहेर देतसे तुम्हांस भिरकावूनी.

देवगड १२–८–५२

* * *

# ४५. तीं हींच फुलें का ?

[ लीलारति आणि भूपतिवैभव मिश्र ]

मी झालों होतों ज्यांस्तव वेडापिसा
तीं हींच फुलें का, प्रश्न पडे मानसा

तीं हींच फुलें, पण त्यांच्यामधुनी उणा
दिसतसे जाहला सारा ताजेपणा
तें ताजेपण म्हणजेच फूलपण हो की
तें सरल्यावरती कचरा उरतो बाकी.

जे पतंग घेती दीपावरती उड्या
—काय त्या तयांना पणत्या वा तबकड्या
नुसत्याच कितीही स्नेहपूर्ण राहोत ! —
लाविते तयांना वेड नाचरी ज्योत.
धगधगत्या ज्योतींवरि ते होती लुब्ध
नच भान, विचार न, कीं त्या करिती दग्ध.

ज्या जळतां जळतां जायाच्याच जळून
अपुल्यांतच परि त्या जळावयाचा मान
देउनी पतंगा, ज्योति धन्य होतात
तीं ज्वलंतता एरव्ही न गणती सार्थ.

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. क्र.
शाखा

मधुगंधास्तव हे भृंग फुलांभवताली
कल्पना खुळी अरसिकेंचि दिसते केली !
बाटल्या मधाच्या तसेच अत्तर-बुदले
भृंगांस वेधिती कां न दुकानामधले ?
करि तयां फुलांचें ताजेपण बेभान
तच्छंदें स्फुरतें त्यांचें रुंजन-गान
धगधगितपणा जो दीपांच्या ज्योतींत
तो तोच होइ टवटवितपणा पुष्पांत
त्यासाठीं करितो भृंग जीव कुर्बान
तें रुंजनगुंजन कुर्बानीचें गान
तें रुंजनगुंजन क्रीडा कुर्बानीची
ती क्रीडा परमावधीच सौभाग्याची.
ती नव्हे मधास्तव याचक-वृत्ती त्याची
मधुबिंदुदान — ती कृतज्ञता पुष्पाची !

मी झालों होतों ज्यांस्तव वेडा पिसा
तीं हींच फुलें का, प्रश्न पडे मानसा.
तीं हींच, ठरवुनी मजसी वेडापिसा
शोधिला जयांनीं कसलासा भरवसा !
भरवसा मिळाला असेल की ना कळे
परि गमावलें तें वेड जीवनांतलें !
का वेडावांचुनि येइ जीवनीं रंग ?
तो रंग यावया हवाच वेडा संग.
भरवसाहि द्याया हवाच वेडापिसा
भरवसा हिशेबी कामा येइल कसा !

जें सरायचें तें संपत असतांनाच
बेहोषपणाने घालित पिंगा नाच
जर सरलें तर वाटेल कधीं न भकास
शुष्कताहि गमतें तुडुंब भरली कास

जें सरावयाचें तें तर गेलें सरुन
तें सरलें वाढुन, सरलें नच झिंगून
शोधाया जाउन व्यवहारीं भरवसा
काय ह्या फुलांची ओढवली ही दशा !
दैन्यही गमावें श्रीमंती अक्षय
परि घडला नच ह्या श्रेयाचा संचय !
त्यामुळें आज जें दैन्य दाटलें अन्तीं
किति तयास लपविल वरपांगी श्रीमन्ती ?

झोंबतां पतंग न, दीपशिखा जर विझली
काजळीच केवळ तिथे दिसे उरलेली !

१२।२०-८-५२

* * *

# ४६. हे हार गौरवाचे

[ जाति—वल्लभा

हे हार कंठीं गौरवाचे माझिया पडतांक्षणीं
त्यांच्या गळाया लागल्या कां पाकळ्या कोमेजुनी ?
कंठीं तशा वक्षःस्थळीं व्हाव्या तयांना जाळत्या
घामांतुनी माझ्या तरी वाफा विषारी कोणत्या ?
हारांतल्या पुष्पांप्रती ही वाहवा कां नावडे ?
हा प्रश्न—पेटे चूड, तेव्हा हेंच की उघडें पडे—

म्हटलें ' कधी करणार ना कोणापुढेही याचना '
आशाळ चित्तीं वांछितां ' व्हावी भली संभावना '.
म्हटलें जनीं ' निंदा स्तुती दोन्हीहि मातें सारखी '
जरि आस की ' स्तुति—कौतुकें श्रवणीं पडावित सारखीं '
अध्यापनीं धिःकारिलें दुःशील ज्यांचें वागणें
म्हणतां मनीं परि ' जीवितीं सच्छील झालें लोढणें. '
प्रस्थापिलें ऐटींत की ' ऐश्वर्य ही निर्द्रव्यता '
नित छेडितां मन ' साहवे निर्द्रव्यतेची ना व्यथा '
वाखाणिले लोकांपुढे प्रभु-रामचंद्राच्या व्रता
कान्हा करी गोपींसवे चेष्टा मनीं त्या चिंतितां
स्वेषें पवाडे गायिले वीरश्रिच्या आवाहनीं
होतें जरी जुळवीत मानस आंत फक्कड लावणी

‘ लोभाविना ये पाहतां सौन्दर्यसम्राज्ञीकडे ’
हें सांगतां आसक्तिने घायाळ हें मन बापडें
म्हटलें ‘ उरीं अभिमान पोलादी हवा विपदेंतहि ’
कटि-मान हीं लाचारिनें लववीत लोकीं प्रत्यहीं.

स्फुरलें मनीं दडपून तें ऐसें दिखाऊ घोकतां
ही भीरुता ही दंभता पावे समाजीं मान्यता
संपादणीला भाळुनी उद्युक्त हे जन गौरवा
कंठांतल्या हारां परी का सह्य व्हावी वाहवा ?
म्हणुनीच गौरव-हार हे कंठांत की पडतांक्षणीं
करपून गेले आंतल्या वाफा विषारी लागुनी.

मुंबई–पुणें–प्रवास
१–१०–५२

* * *

# ४७. नको थांबवूं कारंजे

[ छंद देवीवर

हसूं येतां अनावर मुखीं लाविसी पदर
दिसूं नये काय कोणा तुझें दिव्य जवाहिर
हसें फुटतां, कोणाचें प्रगटतें कांहीं उणें
तुझें सौंदर्य परंतु हासण्यानें होई दुणें
बोलतांना नुसतेच दांत दिसती किंचित
लाटांसरशी स्मिताच्या सारी लकाके दौलत
बोलतांना गालीं रेषा जों न उमटे तों विरे
हास्यें उसळती तेथे रंगी-बेरंगी भोवरे
बोलतांना हालती जे ओठ कांहीसे संकोचें
हासतांना विकसती कानें-कोपरे तयांचे
बोलतांना नासिकेचें होई क्वचित स्फुरण
उच्छृंखळ हास्यें तेथे थरथरतें नर्तन
बोलतांना अवघ्याच मुद्रेवर अकारण
भास होई तरळत असावें की आवरण
स्मितावेगें आपोआप पार जाई तें विरून
धुकें लोपून ज्यापरी फाकतसें लख्ख ऊन
तरी हसें उसळतां मुखीं पदर घेसी कां ?
हिरे-माणकांच्या नको घेऊं झाकून संदुका
नको थांबवूं कारंजें नाचतांना थयथय
नको विनयें करूंस इंद्रधनुष्याचा लय

उस्मानाबाद, ६-१०-५२

* * *

# ४८. दिवसांमागून चालले दिवस

[ मुक्तछन्द

दिवसांमागून चालले दिवस !

घडल्या गोष्टींचा जाहला गुंता
कांहीं केल्या कसा उलगडेना
कितीक समस्या जटिल घोर
तटबंदीपरि अभेद्य समोर
चालेना युक्ति,
अपुरी शक्ति,
लंघतां येईना; कुंठली गति !

चक्रव्यूहामाजीं शिरला सौभद्र
आत्मविश्वासें योध्याच्या आवेशें
येईना परि कराया भेद
शत्रु पडले तुटून त्वेषें
आणिं नि:पात जाहला जरी
नि.पातहि होई तया भूषण !

आम्ही ? प्रवाहपतित !
सांपडलों अवचित
चुकून चक्रव्यूहांत.

अस्तित्वचि ज्याचें नव्हतें ठावें
कसलें तेथे शौर्य स्फुरावें ?
गांगरून गोंधळून
अगतिक मरगळून
जाणारचि कीं, हें ठरलेलें !

मनोरथ गेले विरून हवेंत
संपादिलें श्रेय नुरलें कवेंत
संकल्पांना नाही लागला हात !

गेली काचेंतील वाळू झिरपून
पोकळी राहिली भोवती भरून
काचयंत्र येई कराया उलटें
काळचक्राचे त्या परंतु दाते
लागतील काय फिराया परत ?
कुठून दंडांत तेव्हढें सामर्थ्य ?

सागराच्या लाटा देतात धडका
किनारावरल्या प्रचंड खडका
फुटल्या लाटेंत हजारो झुंबरें
फुटून, चुरा लाटेंत विरे
नव्या दमाने पुन्हा ती सरसरे
शिलाखंडीं घ्याया फोडून शिरें.
असलें तेज, असला दिमाख
बघणारांचे दिपतां आंख.

तेव्हढा तरी झुंजारपणा
पराभूतींमध्ये पाहिजेच ना ?

काळचक्रांतून संभवे जें जें
तेंच मिरवितों ' कर्तृत्व माझें ' !
समुद्रमंथनीं जें जें निष्पन्न
सुरासुर ते घेती वाटून
परंतु घ्यावें मंदराने काय
रत्नें निर्माण केल्याचें श्रेय ?

एकान्तीं ऐसें येतां उमगून
माझेंच मला खातसे मन—
" दिवसांमागून दिवस चालले !
पैलथडी कधीं पोंचणें ? कुठलें ? "

९-११-५२

* * *

# ४९. कां करितों कविता ?

[ जाति—चंद्रकला

कां करितों कविता ? दरवळे फूल कशाला हें ?
घेत घेत वळणें-वाकणें कां ओहळ वाहे ?
वसुंधरा भ्रमते भिंगरीपरी सारखी कां ?
तेजोवृष्टि करी अखंडित भास्कर कां देखा ?
वाफ जळाची कां होउनी मेघ नभीं जमती ?
कां निज सर्वस्वा ओपिती आणि धरेवरती ?
उरीं दाटुनी कां येतसे जननीच्या पान्हा ?
बळेंच ओढुनि कां स्तनीं ती लावितसे तान्हा ?
हात पाय हल्वी उताणा कां पडल्या-पडल्या —
बालक हा ? घुमतो आणि कां हुंकारें अपुल्या ?
स्फोट कसे ज्वालामुखींचे होति अकस्मात ?
क्षोभुनि सागर कां राक्षसी करि लाटानृत्य ?
थरथरतें कां तें सारखें तरि पिंपळपान ?
सकल समजतें हें ? सांगणें तरि नलगे आन !

२०-९-५२

* * *

## ५०. हा टपालवाला

[ जाति–भूपतिवैभव

हा आला आला टपालवाला आला
धावली तयास्तव दारीं मुग्धा बाला
देउनी सुगंधी पत्र गुलाबी जाओ
ती हरखुन भुर्कन लपली आडोशाला

तो तसाच जाई पुढच्या आणि बिऱ्हाडीं
तों युवक तयास्तव कुणी उतरला माडी
बघतांच लिफाफ्यावरिल मायना वळण
पातली पाठिशी नवथर हिरवी साडी

तो टपालवाला पत्र टाकुनी जाओ
तें वाचुन घ्याया अधीर आजीबाओ
मजकूर सांगण्यापूर्वि तिला करतात–
‘ हं, पेढे काढा आधीं ’ अैशी घाओ

तो कुठे टाकुनी जाओ पुडकें जाड
नच बघतां कळतें काय असावें उघड
पुटपुटतो मालक ‘ अरसिक सगळे बेटे ’
मग काय नव्हे ‘ साभार परत ’ तें बाड ?

तो वांटित जातो ज्याचें त्यास टपाल
तें घेउन कोणी पिटूं लागतो भाळ
जातसे कुणाची कंबर तोंच खचून
बडबडूं लागतो आणिं कुणी बेताल

किति वेगवेगळें टपालांत वैशिष्य
वाचून रंगवी कोणी भव्य भविष्य
काजवे चमकती डोळ्यांपुढति कुणाच्या
कुणि वाचनमग्ना मधेच म्हणते ' अिश्श !

ह्यापरी जातसे दारावरुनि हमेश
हा टपालवाला !—घालुन खाकी वेश—
हुंदके, उसासे, हर्ष, शोक पेरीत
जणु विचरे लोकीं ब्रह्मा-विष्णु-महेश

२४-९-५२

* * *

# ५१. मराठीच्या देहलीवरून—!

[ जाति–समुदितमदन ]

कारितों जयजयकार प्रमोदें कारितों जयजयकार
जगाच्या कानावर पडणार—
महाराष्ट्र-शारदा-करींच्या वीणेचा झंकार

दिशादिशांतुनि संचरुनी जी घुमली वाङ्मोहिनी
आज ती वळली ह्या पत्तनीं
माय-मराठीचिया देहलीवरती अशरीरिणी

सात समुद्रांपार भूतलीं कुठे कोपऱ्यांतुनी
लेकरें जनीं वनीं विखरुनी
माय—मराठी करिल तयांशीं गुजगोष्टी येथुनी

तारांगण आकाशजान्हवी होति हिंपुटी मनीं
जियेचें वाळवंट देखुनी
तिच्या तटींचा घुमेल जगतीं टाळ-मृदंग-ध्वनी

घेउनि खांद्यावरी पताका पायीं दिंड्यांतुनी
नाचुनी उना-पावसांतुनी
धर्मक्षेत्रीं गजर विठूचा करिती बेहोषुनी

आणि त्याच हो बेहोषीने ठाकावें संगरीं
रणक्षेत्रास गणुनि पंढरी
खड्गधारही तयां वाटते तीर्थवाहिनी खरी

वारकऱ्यांनी धारकऱ्यांनी करुनी आत्मार्पणा
जयाची केली संस्थापना
त्या धर्माची हवी व्हावया पुन्हःपुन्हा घोषणा

बुडवियल्या वेदांस हजारों हातांनी–वीचिंनी
मिरविलें जिने वरी आणुनी
गंगेला आव्हान देहुची देइल इन्द्रायणी

चिंताया परमार्थ-विवेका प्रपंचही नेटका
पाहिजे प्रथम कराया निका
हा भगवा सामर्थ्यवान संदेश इथुनि आयका

गौरिशंकरावर चढणारा तेनसिंग झुंजार
तया नच कां मुजरा करणार—
घोरपडीनें कोंडाणा सर करणारा सरदार ?

जहाल मिरची आणिक हुरडा खुराक हा कसदार
जयांचा, ते वदतिल उद्‌गारः—
" कुणा सोमरस हवा ? सुरभिच्या नको दुधाची धार. "

' जो जें वांछिल तो तें लाहो '–उगवो धर्म उदार
व्हावया दुरित-तिमिर-संहार
आळंदीच्या निधे समाधींतुन ऐका हुंकार.

' अजान तरुची मुळी माझिया दाटुनि भिडली गळा '
अर्थ जो ह्या दृष्टान्तांतला
जाणुनि, उजळा युगानुसारी धर्मा देऊं;–दिला.

कुरुक्षेत्र जाहला समस्तचि जेव्हा हा भारत
तेधवा इथुनि पुन्हा घोषित--
'योगः कर्मसु कौशलम्' असें गीतेचें हृद्गत.

क्षेम केवि नांदेल? शान्ततापूर्ण विश्वसंसार
कसा भरभराटीस येणार?
ऐशा चिंताकुलांस ज्याचा एकमेव आधार—

उभें कमानींवरती चौदा राष्ट्र तेंच भारतीं
द्यावया तथा स्थैर्य बळकटी
घ्या ही ग्वाही – बद्धकटी ही महाराष्ट्र-संस्कृती

अशा युगाची जन्मदात्रि जी ही घटिका होणार
शुभंकर ही घटिका ठरणार
तिचें कराया अभिनंदन हें गातों जयजयकार.

पुणें, २७–९–५३

* * *

# ५२. अर्ध्यामुर्ध्या कवितांनो !

[ जाति बालानन्द ( दोहा–समपाद )

अर्ध्यामुर्ध्या कवितांचे कपटे जमले येथ किती
बांधत असतां जणु अपुऱ्या पडुन राहिल्या इमारती
वारस वा धनवंत कुणी कारागीर कुणी पुढती
दिसे कधी तरि नेतांना पूर्णत्वा त्या इमारती
पूर्णत्वातें कधि काळीं जाऊं आपण काय तरी
अर्ध्यामुर्ध्या कवितांच्या भाव दिसे हा मुखावरी

भरणपोषणा बाळांच्या व्हावा कीं असमर्थ पिता
अर्ध्यामुर्ध्या कवितांनो तशीच कां मम अगतिकता
करंटा न मी केवळ त्या अहो दरिद्री पित्यापरी
किती वेगळ्या जातींचें शल्य सले माझिया उरीं !
निर्धनता वा श्रीमंती प्रश्न मुळीं उरला न इथे
जन्मलांत माझ्याच कुळीं हीच न ओळख आज पटे

रितें न झालें रतिभरही शब्दांचें भांडार जरी
अडेल वृत्तें वळवाया लगाम धरिले घट्ट करीं
तुम्हांस बघतांक्षणिं यावा परंतु दाटुनिया पान्हा
ऐशा आपुलकीच्या त्या दिसून येती कुठे खुणा

अर्ध्यामुर्ध्या कवितांनो केवि तुम्हां म्हणु मम दुहिता
न जन्मलेल्या मोत्यांचे रिते शिंपले मज गमतां
न पेटलेल्या ज्योतींच्या तुम्ही कोरड्या कीं पणत्या
विरून गेल्या स्वप्नांच्या अंधुक पोकळ स्मृति नुसत्या !

असुनि तुम्ही मम मुग्ध सुता नसल्यागत झालांत मला
दारिद्र्याहुनि शतपटींनीं भिन्न किती ह्या व्यथा कळा
तुम्हांत माझेंपण मजला येई संक्रांत न करतां
कुठुनि पूर्णता तोंवरती तुम्हां ? अशी ही शोककथा !

१०-१०-५२

# ५३. मुलामा नवा

[ सुनीत–वृत्त वागीश्वरी

हजारो बिघे बाजरीचीं गव्हाचीं
पिकें गर्द होतीं जिथे डोलत
तिथे रान फोफावलें राहुट्यांचें
किती दूरपर्यंत हें सांप्रत
कुठेही न गोठे गुरांचे अता ते
बराकी–बराकीच चोहीकडे
किती चिल्खती मोटरी युद्धगाडे,
किती धावती मालवाहू धुडें.

मिळावा जिथे लाख चोचींस दाणा
पिकें संगिनी–बंदुकांचीं तिथे
ढिगारे पिपांचे, कुठे तार-गंजी,
तशा लागल्या रूळ–राशी कुठे
जिथे कष्टला गाळुनी घाम जो तो
सदा जीवमात्राचिया पोषणा
उभी तेथ संहार-साहित्य निर्मावया
केव्हढी राक्षसी यंत्रणा !

मणांनी, टनांनी अता दारुगोळा
इथे होइ उत्पन्न रात्रंदिनीं

हजारो जनें येति टाकीत धापा
इथे पोट चिंधीमधे बांधुनी
रणीं ठाकिती – तेहि जाळावया पोट —
अभ्यासुनी प्राणघेणी कला
कुणा केवि ' योद्धे ' म्हणावे ?
शिपाईगिरी खाटकांचाच पेशा भला !

महोद्योग शास्त्रीय संशोधनांचा
तुझा बुद्धियन्ता, अगा मानवा,
तुझ्या रानटी मूळच्या वृत्तिलागी
नव्हे फक्त का हा मुलामा नवा ?

पुणें १४-६-५४

* * *

## ५४. निद्रेस

[ सुनीत – शा. विक्रीडित

रात्रीं सन्निध जेधवा पहुडतों आम्ही बिछान्यावरी
घालोनी हलकेच भूल, करिसी निद्रे अम्हां स्वांकित
जी तूझ्या किमयेमुळे प्रगटते सृष्टी निराळी तदा
तीमाजी किति भिन्न भिन्न दिसती नातीं, दुवे, चेहरे

संसारीं जरि एकरूप बनलों धर्मार्थकामीं अम्ही
झोपेंतील जगीं तसेच उरतों संबद्ध आम्ही कुठे ?
ही माझी सहधर्मिणी रमतसे कोठे कशी नाकळे
त्या विश्वामधि मीहि मार्ग वरतों ज्यांना न आगा पिछा

देखावे भलते ! समाज भलते ! व्यापार बेबंद ते—
तेथे चालति. त्यांतली विकटता तों जाग आणी क्षणीं
निद्रे, वैरिण तूं नव्हेस तरि का ? तत्रापि जागेपणीं—
तूतें आळवितों ' सखे, तव असो आम्हांवरी पाखर '

व्हाया वास्तवतेमधून सुटका निद्रा जरी पाहिजे
मृत्यू बंधु तिचाच की !— मग तया प्राणी कशाला बुजे ?

पुणें २४-७-५४

* * *

# ५५. देहाचा निरोप घेतांना

[ जाति—चंद्रकला

जुलुम-जबरदस्ती संपली अतां तुझी देहा
तव पकडीमधुनी निघालों सुटुनी निज गेहा
धडपड आजवरी कितीदा मुक्तीस्तव केली
परी शृंखलांची जहाली मगरमिठी न ढिली
अतां मात्र निकटीं ठेपली अखेरची घटिका
साहिल तटबंदी कोणती काळाचा फटका

✧ ✧ ✧

औट हात अवघी कोठडी कां न तिचा कांच—
तया व्हायचा जो स्वभावें स्वच्छंदी साच ?
तसाच तव दुबळेपणाचा किति झाला जाच
तरीहि घालावा लागला तुझ्यासवे नाच.
असह्य कोंडमारा ! केव्हढी विटंबना क्रूर !
घटी समाप्तीची राहिली अता न परि दूर.

✧ ✧ ✧

परंतु ह्या सरत्या आपुल्या संगातिच्या घडिला
आनंदांतहि ह्या मुक्तिच्या अवघड गमत मला
तुझ्या आश्रयाने मिळाले कांहि सुखास्वाद
कृतज्ञतेने का तयांची यावी नच याद ?

✧ ✧ ✧

अहोरात्र ज्याचा लागला मज होता ध्यास
ह्या तव नेत्रांनीं प्राशिलें त्या सौंदर्यास
वेडा मज केलें जयांनीं ते गीत नि गंध
लुटुनि तुझ्याकरवीं जाहलों कितीकदा धुंद
साक्षात् स्नेहलता बिलगुनी विसावली स्कंधीं
सुखानुभूतीची दिव्य त्या तूंच दिली संधी
दीन-अपंगांना सवुनी कधि झालों धन्य
तुजमुळेच आलें जोडितां काय न तें पुण्य

✥ ✥ ✥

सुखोपभोगांचे माझिया हे साक्षीदार
अवयव तव देहा लागले पडावया गार
थंड अता पडलीं स्पंदनें नसांनसांमधलीं
भगभग रखरख ती काहिली पूर्ण अता शमली
जुलुम-जबरदस्ती व्हायची राख आणि माती
देहा, ठरलेली गती ही एकमेव अन्तीं
परि सुखभोगांचे माझिया कलंक वा भार
साहुनिया यांनी निरामय दिलें मला सार
उपकारक देहा ह्यापरी किती जाहलास
कृतज्ञतेचाही जरी हा सुटकेचा श्वास

पुणें, २५-७-५४

* * *

## ५६. मना !

[ शुद्धसती छंद

सांगितलें कोणीं तुजलागी मना !
करावया नाना विचित्र कल्पना ?

मांडतात बाळें वाळवंटीं खेळ
उभारिती किल्ले खोदतात हेळ
परत जायाची होतां परि वेळ
विना-खेद-खंत निघती तात्काळ
परि मना, तुझ्या कल्पनेच्या क्रीडा
होतात तुलाच लंगर वा खोडा !

आढळे सहज गवताची काडी
तिने कल्पनेंत बांधतोस माडी
उंच महालीं त्या थाटिसी संसार
व्यवहारीं ज्यास तिळ ना आधार
येइना तयासी मूर्त रूप तिळ
म्हणून करिसी आणि हळहळ !

घेऊन पणत्या घाल तेल वात
लावून सोडून देई प्रवाहांत
जळल्या, विझल्या, बुडल्या, तरल्या
अथवा कुठल्या काठाला लागल्या,

कशाला करणें फिकीर उगाच ?
पुर आपणा तो गतिमान नाच !

परि पणत्यांची तुजला आसक्ती
झाकून आणिसी पदराखालती !
कां न पेटणार ज्योतींनी पदर ?
आणि उडणार जीवितीं कहर ?
"उडाला कहर!" करिसी आक्रोश—
मना, तुझा तूंच वैरी कां होतोस ! !

पुणें २-८-५४

* * *

ग्रंथ ... वाकळकर
अनुक्रमांक ........ वि: ..........
क्रमांक .......... नों: दि: ..........

# ५७. केलीत घराची होळी ?

[ जाति—भूपतिवैभव ]

केलीत तुम्हीं माझिया घराची होळी
राहतों कुठे तरि अता वळचणीखाली
वनवास असा हा आला मम नशिबास
म्हणुनीच न केवळ हळहळ, हे निःश्वास
केलीत किती घर जाळुन माझी हानी
ती मोजावी कशि आणे—पै—रुपयांनी !
तें तसें खरोखर होतें फार जुनाट
मग हिशेब करणें कसला तरि रुपयांत ?
जी तरीहि हानी झाली अपरंपार
तो विठू महारहि घेउन नव अवतार
जरि आला द्याया करूनिया भरपाई
हातुनी तयाच्या तरीहि होणें नाहीं !

त्या घरांत गेले नांदुनि वाडवडील
ज्यांनीं न होउनी दिलें कलंकित शील
त्या घरांत होते नांदत पूर्वज जे जे
ते ठेवत होते नित्य खुले दरवाजे
केव्हाहि त्या घरीं आल्या-गेल्यासाठी
आदरें वाढली गेली डाळ नि रोटी.

त्या परसामधली विहीर वा फुलबाग
तेवि त्या घरांतिल रांजण आणि कणिंग
भागवीत होती गांवकऱ्यांची गरज.
दिलदारपणाची श्रीमंती गडगंज.
जरि कोप जाहले अस्मानी सुलतानी
सोडिलें ब्रीद ना, इमान वा कधि त्यांनी.

कधिकधी जुनेरें नेसुनि एकच एक
त्या घरांत आई शिकवुनि गेली नेक
साक्षेप ठेविला सर्व कुलाचारांत
नच शरमिंधेपण वरिलें व्यवहारांत
लागले जेधवा तिचे गुटमळू प्राण
तेंधवा टाकतां मम खांद्यावरि मान
'कधि अंतर देऊं नका कुलाचारांस'
सांगून सोडिला तिने अंत्य निःश्वास.

टेकीस पितामह आले कर्जापायीं
परि दिली तयांना मम ताताने ग्वाही
आणि तें शिरावर घेउनिया, निकराने
निपटून टाकिलें चक्रवाढव्याजानें
ठेविला कुणाचा छदामही नच बाकी
जरि कुणी म्हणाले पुढती "राहूं द्या की!"
सर्वथा जयाची दिनचर्या अकलंक
जो कधिहि वृत्तिने नव्हता क्षुद्र नि रंक

कोणींहि म्हणावें अजातशत्रू ज्याला
भुरट्यांनी केला परंतु त्यावर हल्ला !
“ दुखविलें कुणा नच, केला नच अपहार;
मग कोण उगारिल माझ्यावरति कुठार ?
नजरेने वाइट कुणा पाहिलें नाहीं
वाईट कुणाचें कधिहि चिंतिलें नाही
माझ्याहि वाइटावरी कुणी हो नाही
मग देउं जबानी कसली ? घेतां कां ही ? ”
व्यसनींहि ह्यापरी अभंग ज्याचा भाव
त्यावरी पडावे कुऱ्हाडिचे का घाव ?
विपरीत नव्हे का ? घडलें हाय परंतु !
निष्पाप तयाचें रक्त सांडुनी वास्तू—
अधिकाधिक पावन गेली होत जयाची
केलीत तुम्ही त्या राख घरादाराची !

जरि ढासळलेलें कुसू तयाचें होतें
जरि झडुनि चाललें होतें त्याचें जोतें
परि नांदत त्यामधि जे जे कोणी होते
सच्चेपण त्यांचें कधीहि ढळलें नव्हतें !

घर नव्हतें केवळ खांबांचें तुळयांचें
तें नव्हतें केवळ विटा–दगड–कौलांचें
तें निशाण होतें प्रामाणीकपणाचें
तें निधान होतें पुण्यश्लोक कुळाचें

तें प्रतीक होतें चारित्र्यादि गुणांचें
तें अबोल होतें व्यासपीठ धर्माचें.
जाळून टाकिलें तुम्हीं न हो घरदार
लाविलात माणुसकीस तुम्हीं अंगार.

ताईत गळ्यांतिल किंवा गंडे-दोरे
ते मुळांत असती क्षुल्लक सर्व बिचारे !
परि मंतरल्यावर तयां लाभते महती
त्या महतीचे का दाम कराया येती ?
माझिया घराचे तेवि कोपरे कोने
अभिसिंचित होते पूर्वज–पुण्याईनें.
जड घरावरी त्या ठेवुनि हाय निखारा
टाकलात जाळुनि दिव्य वारसा सारा !
अवघ्याहि जगांतिल अर्थसाचिव ते जमुन
का उभारणी करतील तयाची फिरुन ?

७–८–५४

☆ ★ ★

## ५८. बरणींतील फुलें

[ जाति–भूपतिवैभव

रे रसिका, आम्ही फुलें तुला जरि प्यार
प्रीतिचा तुझ्या हा अजब किती व्यवहार !

आम्हांस विकासानंतर शीघ्र विनाश
जातसे तेवि ही कान्ति क्षणीं विलयास
वाटुनी आमुच्या ह्या नियतीची कींव
तूं सजसी प्रेमें हटवाया दुर्दैव
तो विनाश अमुचा वारायातें दूर
दीर्घायु द्यावया कान्तीला भरपूर
तूं बुद्धिवन्त, हा तुवां लाविला शोध
योजिसी बिलोरी शुभ्र अम्हां प्रासाद
परि जीवन-द्रव्यें भरलीं जीं प्रासादीं
त्यांमधे अम्हांला जिवंत मात्र समाधी ! !
हें जिवंतपण ! – जें कुंठित–गति झालेलें
तें जिवंतपण रे मरणाहुनि मेलेलें !!

कां जीवित अमुचें म्हणजे नुसती कान्ती ?
ती कान्ती केवळ लोचन–सौख्यापुरती !
रे जीवित म्हणजे घडणें पूजा सेवा
तें श्रेय कुठुनि परि ह्या जीवन्मृत जीवा ?

रे जीवित म्हणजे दरवळणारा गंध
परि करुन ठेविसी कायमचा तो बंद !

आम्हांस उकळत्या लोटिति जे तेलांत
ते घडविति अमुचा सर्वस्वीं देहान्त
तरि तुझ्याहुनी ते रसिका किति हितकर्ते
जिवदान अम्हां त्या अत्तरांत कीं मिळतें !

प्रासाद हा न तव, नव्हेहि कारागार,
तूं मांडिसि अमुची मेजावर ही कबर !

वेंगुर्लें; १४–२–५५

* * *

# ५९. मुगारे

[ छंद देवीवर

रंग–पोपडे झडून तडे जाती गिलाव्याला
भेगाळून चांदई ती पोंक येई बहालाला
तैसें जाहलें सर्वांग सुरकुतलें वाळूक
गालफडें खप्पड हीं चुरगळलें चिंदुक
झाले निस्तेज लोचन, दुमडली ही कंबर
तुझ्या दुबळेपणाची देहा करूं का फिकीर
भव्य थोर आकांक्षांचा मना अजून हव्यास
नवनवीन स्वप्नांना जन्मा घाली चित्तकोश
विचारांच्या भ्रमणाला नाही अजून अटक
सोसायाला त्याच्या कळा आहे अजून धमक
अजूनिया सौंदर्यानें स्फुरे अंतरीं गायन
आणि बुद्धिभावनांचें उचंबळतें उधाण

साठी सत्तरी उलटो, होवो देहाचें पोतेरें
मनोवेलीस फुटती नित्य नवीन मुगारे

२०–७–५५

* * *

## ६०. वजाबाकी

[ जाति–सूर्यकान्त

नसानसांतुन तुडुंबलेली येइ दिसुन आढ्यता
सर्वांगीं बहरून राहिली अलोट संपन्नता
दक्क्षेपांतुन उडति फवारे सकलांवर तुच्छता
ऐशी तूं मिरवतेस राज्ञी जनीं रूपगर्विता

गर्व कशाचा तुवां वहावा न कळे मजला परि
लावण्यामधि काय तुझें ? तें देणें परमेश्वरी !
म्हणून झाली घरभरणी तव धनवंताचे घरीं
म्हणुन लटकले घोस हिऱ्यांचे मोत्यांचे तनुवरी
कर्तृत्वाने उच्च पदावर तुझा विराजे पति
गुणें तयाच्या भोगतेस तूं मानमान्यतेप्रती

वजावाट हो करतां बाकी काय उरे तत्वता
उरते केवळ तुझीच ऐशी एकच ही ‘ आढ्यता ’

१३-७-५५

* * *

# ६१. नसत्याच्या छायांनी

[ जाति–दासी

“ जाउं नको भिउनि मना हरळुन, वा स्वप्नांनीं ”
म्हणतों, तरि चित्तशांति बसलों मी हारपुनी
मी अथांग दरियाच्या काठावर सुळक्यावर
दरदरून घाम सुटे खाली वळतांच नजर
क्षणिं कोसळणार हाय जबड्यामधि लाटांच्या !–
अजुनि भरे उरिं धडकी स्मरणाने स्वप्नांच्या.

किति गर्दी, किति वाटा, केवि जाउं कुणिकडुनी ?
आड येति आडदांड, मूढ कुणी कडमडुनी
गाडी तों निघुनि जाय दृष्टिपुढुन धाडधाड
भवति होइ शुकशुकाट; माळावर मी उजाड !
खाडदिशी झोप उडे; नित्याचें घर भवतें.
कांहीं तरि हुकल्याची रुखरुख परि कुरतडते.

दरडीवर ढासळत्या किति अरुंद किति अवघड–
पायवाट ! सरपटता होइ उरामधि धडधड
बाजूच्या करवंदी जाळांमधि कुणि तरुणी
तोंच पुसे क्षेमकुशल देत जुन्या आठवणी
तों घसरुनि पाउल, हें खरचटलें सर्व अंग
दरड कुठे ? देवळांत कीर्तनास येइ रंग !
नाहीं धरबंध कांहि ! परि होता स्वप्नभंग
सर्व यथास्थित असुनी बावरतो मन–कुरंग.

गोंधळतों जागेपणिं मी धोपट मार्गावर
स्वप्नें त्या गोंधळांत आधिक घालिती कां भर ?
का विस्मृत घटना ह्या मागतात फिरुनि दाद ?
कीं अफलित आकांक्षा घालतात विकृत साद ?
किंवा जो भाविकाळ येणारा सामोरा
स्वप्नें का सांगतात मज त्याचा हा होरा ?

जो डोळ्यादेखत ह्या जाइ ' आज '—रथ दौडत
नेइ लुबाडुनि माझी तो कसली धनदौलत
हेंच जिथे मज नुमगे तेथ 'उद्या'-मेण्यांतुन
अवतरेल रिपुदल कीं पद्मिनि अनुरागपूर्ण
कितिसा होईल बोध ह्या फसव्या स्वप्नांनी ?
हुरळुनि तरि कां जावें अथवा उरिं घाबरुनी ?

हाय ! जरी हें कळतें तरि जातों गडबडुनी
शांति गमावुन बसतों नसत्याच्या छायांनी !
आहे तें कळत नाहि, सुख कशांत वळत नाहि
नसल्याच्या ध्यासाने जीव मात्र जळत राहि !

पुणें २१-९-५५

* * *

## ६२. हद्द

[ जाति–कमललोचना+भूपतिवैभव

आम्हीच नदी ही हद्दीवर ठेविली !
आमुच्या खरोखर मूर्खपणाची हद्द इथे जाहली !

करुं देते ती का फक्त अम्हांला स्नान ?
भागवी काय ती अमुची फक्त तहान ?
का केवळ अमुच्या देइ बांधवां मान
परतीरावरुनी धाव घेति जे पात्रीं तिचिया जन
तयांची ती का तरि वैरिण ?

जे पैलथडीचे नेती चरव्या भरुनी
जे पैलथडीचे जाती जन डुंबोनी
खिल्लारें वळती घरांस उल्हासोनी
ती काय तयांकारणें वाहते भिन्न रुचीच्या जळें ?
अम्हांला देउन का वेगळें ?

ज्या लहरी तिचिया सर्वांगावर फुलती
का अम्हां सुखविती आणि तयांना खुपती ?
गुदगुल्या कुणास्तव, अठ्या कुणाच्यासाठी ?
वर्तनीं जियेच्या मुळी नुमटती विषमपणाच्या छटा,
द्वैत का तिचिया दोन्ही तटां ?

खग मूक इकडचे ? घेति तिकडचे ताना ?
का येति कारलीं अमुच्या द्राक्षलतांना ?
बाभळींवरी का गुलाब मिळती त्यांना ?
ही पक्षपात-भावना शिवेना कधी जिच्या जीवना
तिची का दुजेपणीं योजना ?

का स्तनीं आइच्या असतें उजवें डावें ?
ह्या प्रश्नानें जी अम्हां सदा वेडावे
व्रत जीचें सकलां पोसावे समभावें
जी नुरवायास्तव सीमारेषा दुथडी वाहे भली
नदी ती हद्द अम्ही ठरविली !

आपलेपणाला हव्यात का हो हद्दी ?
हद्दीच रंगती रुधिरानें मग युद्धीं !
तरि युगंधरांनो अशी चालवा बुद्धी—
ही विभाग—रेषा संसारांताचि जावी सामावली
हद्दिची गरज नुरो भूतलीं

पुणें, १–१०–५५

* * *

# ६३. माझे मारेकरी

[ जाति–पादाकुलक

शिवारांतुनी होतों गुंजत
    दवबिंदूंच्या गुंफित माळा
निर्झरिणींच्या फेनफुलांशी
    करीत कांही बालिश चाळा.

तोंच तेथला वदला वारा
    पोक्तपणाने देत इषारा
" होइ कांहि उपयुक्त असें कर
    अर्थ काय ह्या वेड्या चारा ? "

रित्या मनाने घरास वळलों
    शिवेवरिल तों अंब्याखाली
झुलवी शाहिर गांवकऱ्यांना
    म्हणुनि लावणी रसरंगेली.

तोंच घेतला छंद मनाने
    रसरंगाची करुन शिंपणी
फंद पिकाविले रमवायास्तव
    तरुण कोवळे, नवथर तरुणी.

तोंच कुणी खडसावी " कां रे
    देसि मर्कटा-हातीं कोलित ? "
शरमुनि तेव्हा शिरलों बसलों
    ग्रंथागारीं बखरी चाळित.

स्फुरतिल बाहू, मर्दीहि घेतिल
नभीं मारुतीपरि उड्डाणें
असे पवाडे गर्जुन घोषें
पुन्हा खोललीं जुनीं पुराणें.

" शिळया कढीला ऊत कशाला ?
उकरुन थडगीं लाभ काय रे ?
चोयट्यांत रस नवीन कुठला ?
खाणी उरल्या रितीं भुयारें "—

अधिक्षेप हा पडतां कानीं
तंबोरी तुणतुणें फेकुनी
संदेशाचे खडे बोल मग
फिरूं लागलों घुमवित कवनीं

तों जाणारा—येणारांच्या
अठ्या उमटल्या कपाळावरी
न बोलुनी नापसंतीच की
त्यांनी ऐकविली मज सारी—

" घरीं नि दारीं सांज—सकाळीं
विटलों वटवट अशीच ऐकुन
तूंहि आपल्या वीणेवरुनी
तीच लाविसी कटकट भुणभुण ! "

' हद्द जाहली अतां ' म्हणोनी
घरा परतलों कुंठित—मानस
दारें लावुनि, लापट कुलुपें
बसलों खोलत लावुनि कानस.

तोंच येउनी वडील वदती—
" उसकटसी कां चिंध्या अडगळ ?
पेटाऱ्यांतिल कुबट हवेनें
चिडतिल सगळे वाटुनि मळमळ !

हेवे दावे क्षुद्र नेभळे
कडब्यासाठीं गव्हाणींतल्या
लुळ्यापांगळ्या तेवि शर्यती
बंद खजूरी बोऱ्यामधल्या

अशा जिण्याचा विसर पडोनी
व्हाया वृत्ती टवटवलेल्या
दे शिंपडुनी अशा फुलेला
उषादेविच्या कटाक्षांतल्या.

तृणांकुरांचे तुरे खोवुनी
दवबिंदूंचा साज चढवुनी
निर्झरिणींचे फेनिल पैंजण
चरणीं बांधुन घेई रंगण

मदिर चांदणें पाज सुरेलें
मरगळलेल्या मानस-कोषा
जीव होउनी हलका-फुलका
पोहूं लागो नभीं जरासा

गांजुन गंजुन पिचुन चालले
हपापले ते ह्यास्तव बाळा "
श्रवुनि अपेक्षा ही निःश्वसलों—
" अतां सांगतां ! हाय कपाळा ! !

अहो, ह्याच कीं हव्यासानें
होतों गुंजत शिवारांतुनी
परंतु तेव्हा मूर्ख ठरवुनी
दिले हुसकुनी मला तेथुनी !

तेथुन वळणावळणावरती
भेटत गेले जे जे कोणी
ऐकुन त्यांचें आलों इथवर
श्रेय काय हें पर्यवसानीं !

गात्रें आलीं मोडकळीला
हयात सरली चालुन चालुन
स्वप्नांताहि गंधर्वसृष्टि ती
पाहुं न शकती थिजले लोचन !

एकच आता खंत सले कीं
वच ज्यांचे मी हाय ऐकिले
हितैषी न ते, ते सर्वस्वी
माझे मारेकरीच ठरले !

आणि तयांच्या वचनांलागी
भाळुन, सादर धरुनि मस्तकीं
बनुनि दिवाणा, ठरलों अंतीं
माझा मारेकरी मीहि कीं ! ”

११-१०-५५

* * *

# ६४. या रे फुलपाखरांनो !

[ अभंग छंद—देवीवर

या रे, फुलपाखरांनो, तुम्हांविना बाग सुनी
तुमचिया चाहुलीने हरखले कुंज मनीं
मिठी तोंडाची कळ्यांच्या होऊं लागली मोकळी
तुमचिया स्वागतास सज्ज पाकळी पाकळी
दबलेलें अंतरांत घुमूं लागे भावगीत
जैसें मधुर तैसेंच जन्मजात सुगंधित

या रे, फुलपाखरांनो, स्वैरपणें बागडून
टाका सारा बगीचा हा आनंदाने उजळून
तुम्ही जातांच जहाला शुकशुकाट भोवती
तुम्ही परततां, कळा प्रेमसुखाच्या लागती
टाकलेल्या माना झाल्या पुन्हा उंचउंच ताठ
ठिबकती आणि वेगें आंसू ओलांडुनी काठ

तुम्ही काल जातांक्षणीं कसें कुलूप लागलें
भरलिया कोठारांत आम्हां उपास घडले
आणि अवतरतांच तुम्ही फिरून आजला
पहा गळून पडती कड्या कुलूपें अर्गळा
तुमचिया आगमनें आलीं कोवळीं हीं उनें
तुमचिया आगमनें आणि फिटलें पारणें

या रे, फुलपाखरांनो,  घाला इथे धुडगूस
शुष्क पर्णसंभारांत  संचेरल नव रस
पंख इवले तुमचे  करतांना फडफड
किती अंतरांत माझ्या  उठे गोड धडधड
माझ्या फुलपाखरांनो  तुम्ही येथलें भूषण
माझ्या जिवंतपणाचें  अहो, तुम्हीच जीवन

मुंबई अहमदाबाद प्रवास
२३-८-४७

* * *

## ६५. राणीच निरंतर तूं

[ जाति–भूपतिवैभव

जरि राज्य तुझें ह्या नकाशामधे नुरलें
अधिराज्य अढळ तव माझ्या हृदयावरलें

होउं दे कितीही उलथापालथ जगतीं
नव तत्त्वज्ञानें घडो कशीही क्रान्ती
माझिया व्यक्तिगत इतिहासांत परंतू
आहेस अखंडित सम्राज्ञीच मला तूं

तुज बहाल केलें राज्ञीपण हृदयाने
तें काय पाहुनी तुझे जवाहिरखाने ?
झालीस जरी मणिकांचनभूषाहीन
प्रतिदिनीं तुला मी भावपुष्प वाहीन

तव पदरीं होते मांडलीक जे कोणी
तुज होते मानित काय मनापासोनी ?
कुर्निसात होते करीत जे दरबारीं
ते तुला न, परि त्या मूर्तिस सत्ताधारी.

क्रान्तिच्या घणाने छिन्नभिन्न तव तख्त
होतांच, निघाले तेहि फिरवुनी पाठ—
जावोत बिचारे, जाणारे ते नकली
मच्छरेंच की तीं किरिटकुंडलावरलीं !

परि गणिलीं मीं नच छत्र-चामरें तख्त
मच्चित्त लोभलें मूर्तिलाच तव फक्त
आपादशीर्ष जें तुझ्या रोमरंध्रांत
पोचेल त्यास का क्रान्तीचा घणहात ?

जें नसानसांतुनि लवलवतें चैतन्य,
माधुर्य तेंवि जें काठोकाठ अनन्य,
जें मुखीं हास्य, जी तव नयनांत लकाकी,
सौंदर्यलक्षणें वरदानेंच तुला कीं.

हें सौंदर्याचें सुवर्णमन्दिर अतुल
ह्याहून दिव्य तो गाभारा आंतील
त्या गाभाऱ्यामधि भावमूर्ति जी रमते
ती " सकलगुणालंकरणयुक्त " झगमगते
मायना म्हणुन जो वापरतात जनांत
तो कोण पाहतो असे कितीसा सार्थ ?
परि तोच मायना तुझिया नांवासंगें
किति परोपरींनीं सार्थ होउनी रंगे
ऐशाच तुझ्या अभिरुची, कला, प्रवृत्ती.
त्यांपुढती चलनीं फिकीच ती संपत्ती.
मति तुझी वितरणे आणि चंद्रिका–धारा
ह्या विभवें राज्ञीपणा तुला परभारा
देऊन टाकिला कधींच मम हृदयानें
ह्या हृदीं निपजतें आणि रोज नव गाणें.

हीं गाणीं म्हणजे त्वत्प्रतिमायुत नाणीं।
हीं नाणीं काय न सांगतात खणखणुनी
की नगारखाने राजद्वारावरले
क्रान्तिच्या ठोकरीमुळे बंद जरि पडले
ते प्रणयमंदिरद्वारीं झडती अजुनी
अन् राज्ञीपण तव इथे अबाधित अजुनी

ती ' उलथापालथ ' करो कितीही क्रान्ती
राणीच निरंतर तूं ह्या हृदयप्रान्तीं

९-११-५२

* * *

# ६६. भेट व्हावी वारंवार

[ छंद—देवीवर

१

भेट व्हावी वारंवार  मागणी ही कशासाठी ?
रमायाची काय हाव  लावण्याच्या तळ्याकाठीं ?
प्रश्न असो हा सरळ  असो अथवा मिष्कील
खोल मनाच्या तळाशी  तीहि कामना असेल !
काय दोष वांछितांना  तळ्याकाठचा विहार
करायचा नाही जर  अंबुजांचा अपहार
काट्यांकुट्यांत हिंडतां  तळ्यांवरील झुळका
मिळाव्यात, आशेंत ह्या  सांग तरी काय चुका ?
काठावर बसूनिया  पाय सोडतांना जळीं
मुळीच ना दुखवीन  फुल्ल पद्मांची पाकळी
तुडवितां रान होई  तळव्यांची जळजळ
शमवाया हवी जळ—  लहरींची झुळझुळ.

२

एव्हढ्याचसाठी पण  भेटी नकोत केवळ
वेगळीच माझ्या मनीं  तळमळ उचंबळ
भेटीमाजीं निघतात  सहजींच गतगोष्टी
गोष्टींतून प्रगटते  तुझी दिव्य गुणसृष्टी
आले वाटचालींत जे  आणीबाणीचे प्रसंग
निभावून तयांतून  कशी आलीस अभंग

कितीकांनी केली कोंडी कितीकांनी केले वार
शिरसलामत येसी भेदूनिया व्यूह पार
धारिष्ट ना खचूं देतां स्वीकारितां न लाचारी
निंदकांना भुरट्यांना पिटाळिलेंस माघारीं
गोष्टी रंगतांना ऐशा तुझें चारित्र्य झळके
निघालेले मनाचे ह्या येती भरून पळके.

३

चारित्र्यांत विभूतींच्या गुण किती अलौकिक
जरी सर्व वंदनीय उपजेना जवळीक
नभीं दिव्य नक्षत्रांची जरी पखरण दाट
दीपपंक्ती नगरांत हवी दावावया वाट
लखलखाट आणिक असो कितीही मार्गांत
हवी आपुल्या खोलींत प्रखर वा मंद वात
तुझ्या गुणसंपदेचा म्हणूनिया मला लोभ
श्रेष्ठ चरित्रें असोत ग्रंथालयां लखलाभ
श्रेष्ठ चरित्रें गमतीं जणु धान्याचीं कोठारें
तुझ्या गोष्टींत डोलतीं सस्यशामल शिवारें
जावा लयास अंधार व्हावा हुरूप–संचार
म्हणूनिया मागतों मी तुझ्या भेटी वारंवार.

११-१०-५३

* * *

# ६७. तूं येतेस समोरुनी

[ सुनीत—शा. वि.

तूं येतेस समोरुनी उतरुनी जेव्हा जिना अंगणीं
आली काय घरेवरी गमतसे भागीरथी स्वर्धुनी
स्रोतांतून जलध्वनी खुसुखुसू होई तिच्या ज्यापरी
तैशी सळ्सळ पायघोळ तुझिया वस्त्रांतुनी भर्जरी

स्रोतामाजि सुरम्य विभ्रम दिसूं येती समीरामुळें
तूतें काय हवें निमित्त असलें बाहेरुनी लाभलें ?
अंगोपांग तुझें किती लहरतें कोंदाटल्या यौवनीं
तेणें विभ्रमचारुता प्रकटते साध्याहि चालींतुनी

आजूबाजुस ज्यापरी पसरती स्रोतांतुनी सीकर
भासे सिंचि तसे तुषाराहि तुझा सौंदर्यरत्नाकर
जैसा रंगविलास इंद्रधनुचा जन्मे तुषारांतुन
त्वन्मूर्तींतुन तेवि रंगवलयें होतीं परावर्तन

ऐशी सन्मुख पाहुनी तुज, गमे आली तपस्या फळा,
माझें उद्धरशील जीवित, लया नेशील साऱ्या कळा.

सांगली १८-१-५४

* * *

# ६८. रंकाच्या ऋजु भावनाहि

[ सुनीत—शा. वि.

होत्या खोल मनामधे दडपुनी ज्या कामना ठेविल्या
झाल्या आज जरी असावधपणें संभाषणीं त्या खुल्या
त्यांची मानुं नकोस भीति, बुजुनी जाऊं नको त्यामुळें
गेलों बोलुनि तें अशक्य घडणें हें कां न मातें कळे ?

चंद्राचीच जरी मिरास अवघी तें दिव्य तारांगण
लोभावें न तयांप्रती बघुनिया कां कीटकानें पण
त्यांचा गौरव गात कीटक रमे स्वच्छंद भूमीवरी
त्याचें ऐकुनि भावगीत बुजती का तारका अंबरीं

होतें सुप्त मनांत जें, तुजपुढें वाचा तयाला फुटे
व्हावें संमत सानुराग तुज तें हें भाग्य माझें कुठें ?
व्हायाच्या तुज यातना न नुसत्या, वाटेल माझी घृणा
रंकाच्या ऋजु भावनाहि ठरती निर्बुद्धता वा गुन्हा

जाणे मी,—उपसर्ग भार बनुनी नातें सुखी का जुळे ?
भृंगा सादर सेविती कमलिनी—ते न्याय काव्यांतले !

पालघर २४-१-५४

* * *

# ६९. जा ही देउनि साक्ष

[ सुनीत–शा. वि.

चित्तीचीं वदलों गुजें अडचणी मार्गीं न निर्मावया.
ओघाला सरितेचिया वळवुनी वांछी न आणावया.
ज्याने जीवितहेतु योजुनि असे ठेवीयला आपुला
यावा व्यत्यय त्यांत कां मजमुळे ? हें मानवेना मला.

झालें जीवितहेतु–ऐक्य तरि तें दोघां सुखा कारण
होता मीलन यापरी उभयतांलागी खरें भूषण
स्वप्नां विस्मरणेंच भाग जर हो एका दुजाखातर
त्यांचें मीलन एकजीव घडणें कैचें सजाह्यान्तर ?

जे कोणी सहजीवनीं विसरती स्वप्नें मतें आपलीं
त्यागी वृत्ति तदीय ती बहुपरीं जातेचि वाखाणली
तीं स्वप्नें नि मतें परंतु पुढती होती कुरूपापरी
ह्यासाठीं स्वमतांनुसार अपुल्या तूं चाल मार्गावरी

चित्तीं ओढ तुझ्याहि लागुनि असे माझ्याकडे दुर्दम
ह्याची देउनि साक्ष जा; मग न ह्या जन्मीं घडो संगम !

१९-२-५४

* * *

# ७०. मज नव्हती हिंमत

[ छंद देवीवर

स्विकाराया प्रेम तुझें मज नव्हती हिंमत
केली बाजारभावाने त्याची म्हणून किंमत
धुवांधार पावसांत चिंब भिजत भिजत
हिंडावयास हिंमत हवी अंगांत मनांत

फिरतांना पावसांत डोईवर घेणें छत्री
संरक्षणाच्या साधनीं वृत्ति लपलेली भित्री
तैशीच मी भ्याड ! केलें तुझ्या प्रसादाचें मोल
आत्मरक्षणार्थ केली पुढें नोटांची मी ढाल

काय नव्हतें कळत देतां किंमतीचे दाम
तुझ्या जिव्हारीं होईल तेणें जबर जखम ?
परि तुझें वरदान सांग कसें अंगिकारूं ?
केवि कळपावेगळी वाट धरील मेंढरू ?
स्वीकाराया प्रेम तुझें काय आहे मी मोकळी ?
डांबुनिया ठेवणारी गळां पहा ही साखळी !

तुज परत लावाया समजूत घालूनिया
तुझ्या प्रेमाची ओळख होती पाहिजे द्यावया
तीच द्यावया ओळख हवें मुळांत धारिष्ट !
धारिष्टाच्याच अभावीं सर्व ओढवे अरिष्ट !

ओढवल्या अरिष्टांत काय करूं तरी सांग ?
भ्याडपणाने घेतलें मूढपणाचें मी सोंग
आणि तुझें वरदान घालूनिया ताजव्यांत
दिली बाजारभावाने तुझ्या हातांत किंमत
तुला परत लावाया तुला करावें जखमी
स्थितीमाजी त्या सुचला हाच उपाय हुकमी

झाली जिव्हारीं जखम गेलास तूं विव्हळत
‘ किती निर्दय ’ म्हणून असशील निखंदत
परि जबर जखम झाली तुला न केवळ
कुणासही कळेल ना मीहि अंतरीं घायाळ !
आणि कळोच ना कोणा माझी चिर तळमळ
आणि रक्त वाहणारें उरांतून भळभळ

७-१०-५३

* * *

# ७१. रेल्वेच्या रुळांची मनोव्यथा

[ जाति—चंद्रकला

रूळ रेलवेचे चालले दूर दूर दूर
कळुन घ्यायची का तयांची कुणास हुरहूर ?
येत येत जवळीं निमीलित झालेले दिसती
जें दिसतें सारें खरें का तें असतें जगतीं ?
दृष्टिभ्रम गणुनी सत्य, ते पसरुनिया हाय
संबंधित जे जे तयां कां कारितां अन्याय ?
भासचि केवळ तो रूळ ते जुगलेले दिसती
परि मीलन त्यांचें होउनी देई ना नियती
ह्या नियतिन्यायें तयांचे तडफडती प्राण
कळेल तगमग ती आपुले घाल जरी कान:—

" तुझी आणि माझी न व्हावी कधींच का भेट ?
काय जिणें अपुलें समान्तर चालवें थेट ?
उघड दिसे अपुले जन्म हे परस्परांसाठीं,
जरि अन्योन्यांच्या ओढिची आग उरीं पोटीं,
तृषाक्रान्ततेने रसरसे कोरड जरि ओठीं,
ओघ अमृताचे असोनी वांच्छित हे निकटीं,
मृगजळ वळवळतें धावया डागण्याच भवतीं.
हाय, समान्तरता आपुल्या शापचि ठल्लाटीं !

परस्परासाठीं तूं नि मी, जरि ही जाणीव
शुष्क समाधानें निवति का जळणार जीव ?
' आपण समदुःखी ' दिलासा देउनि हा मूक
काय जन्मजन्मांतरींची भागणार भूक ?
पडलों आपण हे जागच्या जागीं जखडून
खिळे ठोकलेले टाकतां येति न उखडून
हवेत चालाया जगाचे सुरळित व्यापार
म्हणुनि समान्तरता योजिली अशी आरपार
व्यत्यय किंचितही रथांच्या गतींत नच यावा
मग आपण मुकलों मीलना, कुणास ही पर्वा !

अंतरांत येती दाटुनी कधीकधी उर्मी—
' करुन बंडखोरी जगाची जिरवावी गुर्मी
आंतिल उर्मींनी खिळखिळे करुनि खिळे उडवूं
भेटुनि कडकडुनी विरघळूं, एकरूप होऊं '
परि घडतिल तेणें जगामधि अनर्थ अपघात
म्हणून हें जगणें समान्तर अखेरपर्यंत ! "

कुजबुज तगमग त्या रुळांची येइल ही कानीं
जरि जनसंमर्दा टाळुनी जाल दूर रानीं.

पालघर २४-१-५४

* * *

## ७२. पुकार

[ जाति–दासी

" आलों मी, आलों मी " करि पुकार कोण तरी ?
येणारा नोहे हा राजा वा माधुकरी.
हा पुकार घुमवी नरहृदयींचा नारायण
दाहि दिशा करिती पडसादांनी पारायण

❖ ❖ ❖

हा पुकार सांगतसे सरला दुरितांधकार
तेजाच्या झारींतुन वर्षत चैतन्य–धार
तो म्हणतो भयभीतां " झणि उघडें टाक दार
व्यर्थ तुझी व्हायची न ह्यापुढती लूटमार
तेंवि ना क्षमा तयास होउं म्हणे जो चुकार
वृक्षाच्या वाढीला बांडगुळें जाच भार
खाटल्यावरी कुणास नाहीं देणार हरी
श्रमिकांच्या पाठीशीं मात्र उभा गिरिधारी
घामांतुनि दरवळेल कस्तुरिचा घमघमाट
आणि झळंबेल तसा रत्नांचा लखलखाट
रे, नांगर-फाळाने निज ललाट-लेख लिहा
काळी ही कामदुघा होते की नाहि पहा "
ही ग्वाही देणारा ठाके हा कामकरी
निर्धारें ह्या नटला स्वाभिमान शेतकरी.

❖ ❖ ❖

"आलों मी, आलों मी" कोण करी हा पुकार ?
दुबळ्यांना धीराचा वाटावा जो विसार
"लाविसि कां भाळीं कर ? कां अश्रू ढाळतोस ?
भाग्यास्तव कोणाचे उचलतोस पायपोस ?
रे मूढा, ह्यापुढती काय हवी लाचारी ?
रे, ज्याचा तोच इथे — कोण दुजा उद्धारी ?
येथ आडकाठी नच आवडत्या उद्योगा
ग्रह राशी सर्व काळ पुरवितील शुभ योगा
अंथरुणास्तव कोणा नलगे ती दगड-धूळ
असलें तर फक्त पूर्वसंचितांत शोकमूळ
एऱ्हवी न कांहि उणें राहणार संसारीं
पोहतील अवघे संतोष-सुखामाझारीं"
हा पुकार घुमवी नरहृदयींचा नारायण
दाहि दिशा करिती पडसादांनीं पारायण.

✤ ✤ ✤

"आलों मी, आलों मी !" देई ही कोण हाक ?
हाकेमधि भरली त्या जरब कुणा, काय धाक !
"येथ अग्रपूजेचा मानकरी नच धनाढ्य
हार-तुरे त्याजलाच जनहितकार जो गुणाढ्य
रेटणार नाहि कुणी कोणाचा येथ बांध
पीडतील नच पुढती दंडहस्त दुर्मदांध
न्यायदेवि ना गणील मतलबी कटाक्ष, खुणा.
शास्त्यामधि जनतेचा पुरता निर्धास्तपणा

फाकतील बुद्धीचे जे जे उन्मेष नवे
ठरतिल ते सुहृदांचे मनुजा कल्याण-दुवे ''
ललकारत आला युगनिर्माता भालदार
खडसावुनि सकलांना सांगत की व्हा हुशार.

✣ ✣ ✣

'' आलों मी, आलों मी ! '' कोण करी हा पुकार
जो का क्षतविव्हलांस दिव्य औषधोपचार
'' आता रणमैदानीं थाटतील उद्यानें
शस्त्रास्त्रें तरि कशास ऋषिमुनिच्या अस्थिविणे ?
कर्तव्याविण कोणा नाहि जात, नाहि धर्म
दुसऱ्याच्या क्षेमाचें अध्याहृत ज्यांत वर्म
प्रभुच्या अवतारास्तव संसृतिच्या मंदिरांत
पुरुष-स्त्री जणु नंदादीपांतिल जोड वात
पूर्व थोर संस्कृतिची चित्तामधिं चाड धरा
कां विलंब मग व्हाया स्वर्गाहुनि रम्य धरा ''
हा पुकार घुमवी नरहृदयींचा नारायण
दाहि दिशा करिती पडसादांनी पारायण

✣ ✣ ✣

'' आलों मी; आलों मी ! '' काळ नवा देइ साद
ह्या मराठ-कवनीं तो ऐका भावानुवाद.

जानेवारी १९५६

* * *

## ७३. जळत्या मेणबत्त्या

[ मुक्तछन्द


तुम्ही जळतां
हुतात्म्यांच्या जीवितापरी
सुरू जाहल्या शुद्ध निःस्वार्थ यज्ञयागापरी
उजळाया मानवतेच्या हितपथा.

कितीक पदार्थ जळते
जळतांना— जळून जातांना देती उजेड
उजेडांत ज्या कांही हिरवट
कांही लालसर, कांही काळेकुट्ट,
देखून मनाला पडते मुरड !
उजेड तो जणु पाणीच गमे गढूळ राड !
उरते त्यांचिया ज्वलनोत्तर चिमुट राख,
तेवढी जागा होई काळीबेरी आणि मेणचट.
दर्शनें मना वाटे मळमळ !

परंतु तुम्ही जळत असतां
मंगल दीप्ती जगास देतां
आणि देहांतून स्रवती पाझर तेहि हिमशुभ्र.
चांदणें धवल की बाह्यान्तर
द्रवून थिजून साचले थर.

जळत्या देहाचें चळो न धारिष्ट
जळतांहि तया करितां पुष्ट.
आणि आत्मज्योति विझण्याआधी
बांधून ठेवतां शुभ्र समाधि
आपुली आपण.
सत्वस्थ साधूचें साकार की पुण्य
उरतें अथवा चारित्र्य पावन.

१-५-५४



## टीपा

१. दीप—आपल्या सत्त्वशीलाचा, तत्त्वज्ञानाचा, त्यागाचा, पराक्रमाचा, भावभक्तीचा—सारांश, भारतीय संस्कृर्तीतील सर्व उज्ज्वल वैशिष्ट्यांचा हा दीप होय. युगायुगांच्या प्रवासांत तो सांभाळून घेऊन जायचें आहे.

'आणि मंडाल्यास०...पुन्हा'—मंडाल्यास तुरुंगवासांत असतांना लो० टिळकांनी 'गीतारहस्य' ग्रंथ लिहिला, त्यावर इथे कटाक्ष आहे.

५. पांथाचें मागणें—'ना घर ना दार' अशा भणंगाची ही भावना आणि अनासक्त विचारसरणी.

७. रूप्याची धारा—डोंगरमाथ्यावरून घनगर्द दरींत कोसळणारा, सुरुवातीला अगदी किरकोळ दिसणारा प्रवाह, प्रसंगीं उग्र प्रळयंकर रूप घेऊनहि, पुढे पुढे विशालस्वरूप पावून महानदाप्रमाणें कसा वाहत राहतो, ह्याचें हें शब्दचित्र. नवा धर्म, नवें तत्त्वज्ञान, नवा शोध, इत्यादींचा उगम किरकोळ स्वरूपाचा असला तरी कालान्तरानें त्यांना विशाल, शाश्वत व कल्याणकारी स्वरूप प्राप्त होतें हें सुचविणें हें ह्या कवितेचें प्रयोजन होय.

८. बालका असाच झोप—अनेक प्रकारच्या (जाति, धर्म, वंश,ह्या अभिनिवेशांतून उद्भवलेल्या) संघर्षांनी सारें विश्व विच्छिन्न होत आहे, असें पाहून, भयाकुल मातेने गायिलेलें हें एक अंगाई गीत आहे.

९. लोकमातांनो !—दि. १२ फेब्रुवारी १९४८ रोजीं भारतांतील विख्यात तीर्थवाहिन्यांत महात्माजींच्या अस्थींचें, मोठ्या गांभीर्यानें व सन्मानानें, विधिपूर्वक विसर्जन करण्यांत आलें. ह्या विधीची भावार्थगर्भता समजून घ्यायला हवी. विशेषतः, महात्माजींच्या हत्येचें निमित्त पुढें करून लोकक्षोभानें जें अत्याचारी स्वरूप कांही कांही मुलखांत धारण केलें त्यामुळे ह्या विधीची भावार्थगर्भता कंठरवाने सांगणें भाग पडलें !

१४. ती चिरंजीवता खरी !—काळ क्षणा-क्षणाने, घडी-घडीनें चाललाच आहे. पण एक वर्ष संपून नवें वर्ष उगवतें त्या वेळीं काळाच्या

202267 वाकळ
क्रमांक 9337

गतीची एकदम जाणीव होऊन मनाला धसका बसतो. व्यक्तीच्या जीवनांत तर ही जाणीव तीव्रपणाने होते. 'वाढदिवस' ही संज्ञा व्यवहारांत वापरली जाते आणि त्या दिवशीं यथाशक्ति सोहळाहि करण्यांत येतो. पण 'वाढ-दिवस' म्हणजे आयुष्याला लागलेली ओहोटीच नव्हे काय? अशा वेळीं मनाला धीर कसा द्यायचा! दीर्घायुष्य लाभावें अशी जी अपेक्षा असते तिचें खरें स्वरूप काय? ह्या विचारांत प्रस्तुत कवितेचा जन्म आहे.

१८. कवि आणि कविता—पंडित नेहरूंच्या षष्ट्यब्दपूर्तिसमारंभा-निमित्त जो 'अभिनंदन ग्रंथ' प्रसिद्ध करण्यांत आला त्यांत ही कविता प्रथम हिंदी रूपान्तरांत आली.

१९. अहल्येचा धावा—"मी अहल्या०" – हल=विरूपता. हल्य=विरूपतेमुळे आलेलें निंद्यत्व. अहल्या=असलें निंद्यत्व नसलेली.

"कशि समजूं हा नट०..." आणि "कपटपटुची दुष्ट लीला"— अहल्येचा पति गौतम मुनी नदीवर स्नानास गेला असतांना तिच्या अभिलाषानें इंद्र गौतमाच्या रूपाने आश्रमांत आला आणि पतिव्रताधर्मास अनुसरून हिने त्याचें वांछित पुरविलें. [वाल्मीकि रामायण—बालकाण्ड—सर्ग ४८ वरून असें दिसतें की, हा आपला पति गौतम नसून इंद्र आहे हें अहल्येने ओळखलें होतें. तथापि, पद्मपुराण—सृष्टिखंडांत] अहल्येने "इंद्र आपलें रूप घेऊन आला असल्यामुळे मला ओळखूं आला नाहीं" अशी आपल्या शापप्रवृत्त कोपायमान पतीची करुणा भाकली आहे. अहल्या इंद्राच्या कपटजाळांत फशी पडली, हीच गोष्ट अधिक रूढ आहे.

अहल्येच्या एकंदर कथेबद्दल पुराणा—पुराणांत एकवाक्यता नाही. मतमतान्तरांची अनेकविधता जिज्ञासूंना जाणून घेतां येईल. एक टोक तर ही सबंध कथाच रूपकात्मक आहे असें सांगते.

प्रस्तुत 'अहल्येचा धावा' हि वाच्यार्थाबरोबर कांही ध्वन्यर्थाचाहि आश्रय करूं पाहात आहे. 'कविः करोति काव्यानि रसं जानाति पंडितः' हें सुभाषित सर्वसाधारण सत्य आहे. पण कितीकदा रसवेत्ते पंडित मौन धरतात— काव्याच्या निर्दोषतेची निःपक्षपातीपणानें ग्वाही देण्याला पुढें सरसावत नाहींत. उलट मतब्रसाधु मात्र आपणाला हवा असलेला अर्थ काढून नसलेल्या गुणावगुणांचा आरोप करतात.

" ब्रोद्धारो मत्सरग्रस्ताः प्रभवः स्मयदूषिताः ।
अज्ञानोपहताश्चान्ये जीर्णमङ्गे सुभाषितम् ॥

अशी परिस्थिति अनुभवास येते. स्वाभाविकच मग—

उत्पत्स्यते च मम कोऽपि समानधर्मा ।
कालो ह्ययं निरवधिः विपुला च पृथ्वी ॥

ह्या भवभूतीच्या उद्गारांनी मनाला धीर द्यायचा !

प्रस्तुत धावा करणारी व्याकुळचित्त अहल्या असल्या जातीची तर नसेल ?

२६. देवाच्या दागिन्यांची चोरी. देवाच्या दागिन्यांची चोरी केल्यामुळें शिक्षेस पात्र झालेला गुन्हेगार कैदखान्यांत, रात्रीं डोळे मिटून पडल्या-पडल्या मनांतल्या मनांत ही कैफीयत देवापुढें मांडीत आहे.

२८. माझे विधाते. ' तिथे आहे ...... लाथ चूळ '—" स्त्रीणां स्पर्शात् प्रियंगुः विकसति बकुलः सीधुगण्डूषसेकात् । पादाघाताद् अशोकः " इ. संकेतांची वाचकास इथे आठवण होईलच.

२९. कालवा आणि नदी—कालवा इष्ट स्थळीं पोहोचावा म्हणून त्याचा मार्ग आखलेला असतो. आणि त्याच्या मार्गात नदीच आडवी आल्यास त्याच्यासाठी पूलहि बांधावा लागतो. पुलावरून कालवा आणि पुलाखालून नदी वाहत आहे, अशा दृश्यावरचें हें भाष्य.

३०. व्याकुळ होतों मनीं—'युगांतर'—दीपावली अंक १९५० मध्यें प्रस्तुत कविता (आणखी आठ कवींच्या असल्याच प्रकारच्या कवितांसमवेत) प्रकाशित झाली होती. त्या अंकासाठीं कवितेची मागणी करतांना संपादकाकडून खालील इंग्रजी कविता नमुन्यादाखल पुढे करण्यांत आली होती—

Four ducks on a pond
A grass-bank beyond,
A blue sky of spring
White clouds on the wing;
What a little thing
To remember for years —
To remember with tears !

— William Allingham

" व्याकुळ होतों मनीं " ह्या कवितेला ह्या इंग्रजी चुटक्यामुळे प्रेरणा मिळाली इतकेंच, बाकी ' स्वतंत्र ' वाटावा इतका वेगळेपणा हिच्यांत आढळेल.

३१. ऋजुता--( एका चिमुकल्या बालिकेचें ) विशेष नाम.

३३. झालों भाग्यविधाते--स्वतंत्र भारताची ' राज्यघटना ' दि. २६ जानेवारी १९५० रोजी मूर्त स्वरूप धारण करती झाली त्या घटनेवर प्रस्तुत कवितेची उभारणी आहे.

पांचाळीची थाळी—पांडव वनवासांत असतांना द्रौपदीला सूर्याकडून एक थाळी मिळाली होती. त्या थाळीच्या सामर्थ्यावर कितीहि अतिथींचें ती अन्नसंतर्पणानें स्वागत करूं शकत असे.

३४. हा कोरा कागद—' असेंच लिहा किंवा तसेंच लिहा ' असें कलावंत ललित-लेखकाला कसें सांगावें ? तो अंतःप्रेरणेनुसारच लिहिणार. तथापि त्यालाहि आत्मपरीक्षणाची आवश्यकता आहे. त्याचा दंडक कोणता ? ' उचलली जीभ लावली टाळयाला, ' हें जसें होऊं नये तसेंच ' उचलली लेखणी लावली कागदाला ' असेंहि होऊं नये.

३८. नातवाच्या बारश्याला—संपन्न सुनेच्या संसारांत मानाचें स्थान नसल्यामुळें जिला वेगळें राहावें लागत आहे आणि स्वकष्टानें जी कसाबसा चरितार्थ चालवीत आहे तिनें आपल्या नातवाच्या बारश्याला जें बाळलेणें पाठविलें त्याचें स्वरूप आणि त्या वेळची तिची भावना.

५१. मराठीच्या देहलीवरून—ह्या कवितेची जाति समुदितमदना आहे खरी;पण फक्त सुरुवातीचें तीन चरणी ध्रुवपद'चंद्रकला' जातीचें आहे.

शेवटच्या कडव्यांतील ' घटना ' म्हणजे पुणें आकाशवाणी केंद्राचें उद्‌घाटन ( २-१०-५३ ) होय.

" कुरुक्षेत्र जाहला.......हृद्‌गत "—स्वराज्यप्राप्तीप्रीत्यर्थ भारतव्यापी चळवळ सुरू झाली तो काळ आणि त्या काळीं तुरुंगवासांत लो० टिळकांनी निर्मिलेला " गीतारहस्य " ग्रंथ.

उभें कमानींवरती चौदा०—" ह्या चौदा कमानी म्हणजे स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेंत नमूद केलेल्या चौदा प्रमुख प्रान्त-भाषा.

५७. केलीत घराची होळी—महात्माजींच्या हत्येनंतर दक्षिण महाराष्ट्रांत जी घातपाती कृत्यांची लाट उसळली तिच्यांत गांवोगांव घरांना आगी

लावण्यावर विशेष भर होता. ज्यांची वाडवडिलार्जित घरेंदारें भस्मसात् झालीं त्या कितीक निर्वासितांची हानि अशा स्वरूपाचीच असणार !

५८. बरणींतील फुलें—कांचेच्या बरणींत कांही रसायन घालून त्यांत ( विशेषत: चाफ्याचीं ) फुलें भरून ती बरणी सीलबंद करून ठेवतात. त्या बरणींतील फुलांचा हा सवाल आहे.

६२. हद्द–इतिहास–भूगोलाच्या वाचकांना माहीत असेलच की देश, राष्ट्रें, इत्यादींच्या हद्दी बरेच वेळां नद्यांनी निर्देशिलेल्या असतात. ह्या निर्देशांनी ह्या कवितेला प्रेरणा दिली आहे.

६४. या रे फुलपाखरांनो—वृद्धापकाळीं मुलांबाळांत रंगून उर्वरित आयुष्य व्यतीत करणारे आजोबा–आजीबाई ह्यांची ही भावना !

६५. राणीच निरंतर तूं—फ्रान्सची राणी मारी आन्त्वानेत आणि कौंट फर्सेन ह्यांचे प्रेमसंबंध इतिहासांत विश्रुत आहेत. कितीक पदच्युत राण्यांपैकी आणखीहि कांहींचीं नातीं अशीं असतील. फक्त तसे प्रामाणिक इतिहास लवकर प्रकट होत नाहींत, इतकेंच ! कौंट फर्सेनसारख्या व्यक्तीची भूमिका ह्या कवितेंत गृहीत धरली आहे.

७०. मज नव्हती हिंमत. " गळां पाहा ही साखळी "— सामाजिक कौटुंबिक, सांपत्तिक, धार्मिक, रूढीविषयक, अशा कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपाचीं अतुट बंधनें.

७२. पुकार—ता. २६ जानेवारी १९५० रोजीं स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार झाली. त्या दिवशीं स्वतंत्र भारतानें नव्या युगांत पदार्पणच केलें असें म्हणायला हवें. त्या पदार्पणांतून उमटलेला, आदर्श लोकशाहीची रूपरेखा दाखविणारा हा ' पुकार ' अशी कल्पना.

" ह्या मराठ–कवनीं०...." दिल्ली आकाशवाणी केंद्रावरून दि. २५ जानेवारी १९५६ रोजीं रात्रीं ' अखिल भारतीय कविसभा ' असा एक कार्यक्रम ध्वनिक्षेपित करण्यांत आला. त्यासाठीं प्रत्येक भाषेंतील एक एक कवीची निवड करण्यांत आली होती. ' मराठी कवि ' म्हणून प्रस्तुत कवीस निमंत्रण आलें होतें. त्या वेळीं त्या सभेंत ही कविता म्हणण्यांत आली. ह्या घटनेला अनुसरून हा चरण आहे.

* * *

REFBK-0009114
REFBK-0009114